शनिवार, १८ फेब्रुवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१७५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●SATURDAY 18 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-175 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5



टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

## राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स


चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :

मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टैंड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803


अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टैंड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.

नियोजित शाखा : धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला

कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177

# देशांतर्गत प्रश्नांमध्ये नाक खुपसू नका

## जयराम रमेश : जॉर्स सोरोसवर भाजपापाठोपाठ काँग्रेसचीही टीका



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करणाऱ्या अमेरिकेतील अब्जाधीश जॉर्ज सोरोस यांच्यावर आता भाजापापाठोपाठ काँग्रेसनेही टीका केली आहे. भारतात ज्या निवडणुका होतील त्याचे निकाल काय लागावेत हे सांगणे जॉर्ज सोरोस यांच्यासारख्या विदेशी व्यक्तीने ठरवू नये, असे खडे बोल काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी जॉर्ज सोरोस यांना सुनावले आहेत.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अदाणी घोटाळ्यावरून आरोप होत आहेत. त्यानंतर आता भारतात लोकशाहीच्या दृष्टीने काही बदल घडणार का? हे विरोधी पक्ष म्हणजेच आम्ही आणि इतर प्रमुख पक्षांवर अवलंबून आहे. तसेच आमची निवडणूकही लवकरच होणार आहे. पण जॉर्ज सोरोस सारख्या लोकांना याच्याशी काहीही घेणे-देणे असण्याचे कारण नाही. आमच्या देशाचा विचार हा नेहरूवादी विचार आहे. आम्हाला आमचा विचार आणि आमची शिकवण हेच सांगते की जॉर्ज सोरोस सारख्या लोकांनी आमच्या देशांतर्गत प्रश्नांमध्ये नाक खुपसू नये या आशयाचे ट्टिट जयराम रमेश यांनी केले आहे.

आजच्या घडीला भारताचे आभार मानणाऱ्यांमध्ये अमेरिकेचे राष्ट्रपती आहेत. फ्रान्सचे राष्ट्रपती आणि इंग्लंडचे पंतप्रधान सुद्धा आहेत. भारताने या देशांशी चांगले आर्थिक संबंध जोपासल्याबद्दल हे देश आभार मानतात. जग मंदीच्या काळातून जात असताना आपला देश जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला आहे. अशावेळी जॉर्ज सोरोस सारखे लोक भारताच्या लोकशाही व्यवस्थेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करत आहेत. जॉर्ज सोरोस यांनी केलेली ही मागणी म्हणजे त्यांना वाटत असेल की आपण मोदींना भारतात झुकवू शकतो. मात्र लोकशाही पद्धतीने निवडलेल्या आपल्या सरकारने अशा उद्योजकांना ठोस उत्तर दिलेच पाहिजे.

हिंडेनबर्गचा अहवाल आल्यानंतर प्रसिद्ध उद्योजक गौतम अदाणी यांना मोठा झटका तर बसलाच शिवाय विरोधकांना मोदी सरकारविरोधात बोलण्यास एक मुद्दाही मिळाला. राहुल गांधी यांनी मागच्याच आठवड्यात लोकसभेत केलेल्या भाषणात सरकारला अदाणी प्रकरणावरून प्रश्नांची सरबत्ती केली. तसेच संयुक्त संसदीय समिती स्थापन करून या प्रकरणी चौकशी करावी अशीही मागणी विरोधकांनी केली. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात अदाणी हे नावही उच्चारले नाही. त्यानंतर आज अमेरिकेतले अब्जाधीश गुंतवणूकदार जॉर्ज सोरोस यांनी मोदींवर टीका केली आहे. तसेच अदाणी प्रकरणामुळे मोदींना त्यांचे पद गमावावे लागू शकते असेही वक्तव्य त्यांनी केले आहे. त्यानंतर भाजपाने जॉर्ज सोरोस यांना खडे बोल सुनावले आहेतच तर दुसरीकडे काँग्रेसनेही आता सोरोस यांनी आमच्या देशाच्या प्रश्नात नाक खुपसू नये असे म्हटले आहे.

### भारतीय लोकशाही खिळखिळी करण्यासाठी आरोपांचे मनोरे : स्मृती इराणी



जग मंदीच्या काळातून जात असताना आपला देश जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला आहे . अशावेळी जॉर्ज सोरोस सारखे लोक भारताच्या लोकशाही व्यवस्थेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करत आहेत, असा हल्लाबोल स्मृती इराणी यांनी केला . त्या पुढे म्हणाल्या की, जॉर्ज सोरोस यांनी केलेली ही मागणी म्हणजे त्यांना वाटत असेल की आपण मोदींना भारतात झुकवू शकतो . मात्र लोकशाही पद्धतीने निवडलेल्या आपल्या सरकारने अशा उद्योजकांना ठोस उत्तर दिलंच पाहिजे . भारताची लोकशाही व्यवस्था आणि तिचा पाया प्रचंड मजबूत आहे . अशावेळी या लोकशाही व्यवस्थेला सुरूंग लावण्यासाठी कट आणि षडयंत्र रचली जात आहेत . जो व्यक्ती आर्थिक युद्धाचा अपराधी आहे तो व्यक्ती आज मोदींकडे उत्तर मागतो आहे . अनेक देशांच्या विरोधात दावा करणारे जॉर्ज सोरोस हे आता भारतीय लोकशाही व्यवस्था खिळखिळी करण्यासाठी आरोपांचे मनोरे रचत आहेत असे म्हणत स्मृती इराणी यांनी सोरोस यांना उत्तर दिले आहे . एवढेच नाही तर अशा माणसाला आपल्या देशाने आपल्या एकजुटीतून उत्तर दिले पाहिजे असेही स्मृती इराणींनी म्हटलं आहे .स्मृती इराणी पुढे म्हणाल्या की मी या देशाची एक नागरिक आहे . त्याच अनुषंगाने मी तुम्हाला सगळ्यांना आवाहन करते आहे की अशा विदेशी ताकदीच्या विरोधात आपण सगळ्यांनी उभे राहुया . जॉर्ज सोरोस सारखे लोक जेव्हा आपल्या लोकशाही पद्धतीने निवडून दिलेल्या सरकारला आव्हान देतील तेव्हा आपण सगळ्यांनी त्यांचा कडाडून विरोध करूया, असेही स्मृती इराणी यांनी स्पष्ट केले .

## महत्वाची बातमी

### धनुष्यबाण आणि शिवसेना नाव शिंदे गटाचेच !



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेनेचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह मिळाले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने हा निर्णय दिला आहे. हा निर्णय म्हणजे उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा खूप मोठा धक्का असल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान, या निकालानंतर उद्धव ठाकरे गटाची आगामी रणनीती काय असेल हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. आठ महिन्यापूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप झाला होता. एकनाथ शिंदेंनी ४० आमदारांसह बंडखोरी केली होती. त्यानंतर एकनाथ शिंदेंनी शिवसेना पक्ष आणि चिन्हावर दावा केला होता. यानंतर मागील आठ महिन्यांपासून निवडणूक आयोगात सुनावणी सुरु होती. याबाबत शुक्रवारी (१७ फेब्रुवारी) निवडणूक आयोगाकडून निकाल जाहीर करण्यात आला आहे. या निकालामुळे ठाकरे गटाला धक्का बसला आहे. तर, शिंदे गटाकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. लोकशाहीला बहुमताला महत्त्व असते. आज आपण पाहिले राज्यात बहुमताचे सरकार स्थापन झाले आहे. हा बहुमताचा विजय आहे. लोकशाहीचा विजय आहे. मी पुन्हा एकदा सांगतो बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांचा विजय आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.

# तपासात महत्वाची भूमिका बजावणारे चार्ली, शेरा


## दहा वर्षे सेवा दिल्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने होतात निवृत्त

आधुनिक केसरी न्यूज

जगदीश कस्तुरे

औरंगाबाद : पोलीस आयुक्तालयातील बॉम्ब शोधक व नाशक पथकात कार्यरत असलेले चार्ली आणि शेरा ही दोन श्वान त्यांची जबाबदारी पार पाडण्यात तरबेज झाली आहेत. या दोन श्वानांची ४ हॅन्डलर दिवसरात्र काळजी घेत असतात. प्रसाद बाबासाहेब लोखंडे, चत्तरसिंग महाजन बारवाल, अनिल माधवराव गायकवाड, संतोष रामराव पगारे हे पोलीस कर्मचारी चार्ली आणि शेरासाठी अहोरात्र तैनात असतात. त्यापैकी लोखंडे आणि गायकवाड हे चार्लीची देखभाल करतात तर जारवाल आणि पगारे हे शेराची देखभाल करतात. रोज चार्ली आणि शेरा यांना पेडीग्रीचा आहार दिला जातो. वरील श्वानांना पुण्यात गुन्हे अन्वेषण विभागात सहा महिने ट्रेनिंग दिलेले आहे. त्यानंतरच त्यांना कर्तव्यावर घेतले जाते. आज्ञाधारकपणा, बॉम्ब शोधणे या कामात चार्ली आणि शेरा निष्णांत झाले आहेत. त्याचप्रमाणे शहरातील संवेदनशील ठिकाणी चार्ली आणि शेरा कर्मचाऱ्यांसोबत आढावा घेऊन येतात. हायकोर्ट, सत्रन्यायालय, रेल्वेस्टेशन, मध्यवर्ती बसस्थानक , सिडको बसस्थानक , विमानतळ, त्याचप्रमाणे शहरातील प्राणभूत केंद्रे हर्सूल तलाव, पावर हाऊस, आकाशवाणी, वाल्मी, हिंदुस्तान पेट्रोलियम. गॅस प्लांट नारेगाव या ठिकाणी चार्ली आणि शेरा रोज आढावा घेतात. तसेच महिन्यातून दोनदा मॉकड्रीलचे आयोजन पोलिस आयुक्तालयातून होतच असते तर नवरात्र उत्सव, गणेशोत्सव, पंढरपूर यात्रा याठिकाणी आदेशानुसार चार्ली आणि शेरा जात असतात. यावेळी बोलताना हॅन्डलर प्रसाद लोखंडे म्हणाले की, हे चार्ली आणि शेरा आम्ही अन्न दिल्याशिवाय कोणाच्याही हातून खात नाहीत. पोलीस निरीक्षक सुशील जुमडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे दोन श्वान आणि त्यांचे हँडलर्स कौतुकास्पद कर्तव्य पार पाडतात हे निश्चित. शेवटी माणसापेक्षाही मुकी सहकारी काहीही न बोलता इमाने -इतबारे आपली जबाबदारी पूर्ण करतात. केवळ १२ वर्षे आयुष्य असलेले हे श्वान दहा वर्षे सेवा दिल्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने निवृत्तही होतात. माणसाच्या हातून ट्रेनींग झाल्यानंतरही यांच्याकडून माणसाने काही शिकावे ?








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## स्वामी कृपा

आधुनिक केसरी

जवळच्याच कॉलेजात तिने बी ए साठी प्रवेश घेतला. रेश्मा मुळातच देखणी असल्याने तिला बारावीपासूनच स्थळे चालून येऊ लागली होती. बी ए च्या शेवटच्या वर्षाला असताना तिला नगरच्या पाटलांच्या मुलाचे, नितीनचे स्थळ आले. नितीन इंजिनिअर झालेला होता. दिसायला उत्तम होता. परंतु सध्याच्या कठीण काळात त्याला चांगली नोकरी मिळणे दुरापास्त झाले होते. मुंबईला एका कंपनीत कमी पगारावर त्याला काम मिळाले होते. पण सुरुवात तर करू या. अनुभवाच्या जोरावर पुढे चांगले काम मिळेल या आशेवर तो ते काम करीत होता. नितीनचे आईवडील रेश्माच्या घरी येऊन तिला पाहून गेले आणि हुशार चुणचुणीत असलेली रेश्मा सून म्हणून त्यांना आपल्या मुलासाठी पसंत होती. मग नितीन आणि रेश्मा यांचीही भेट झाली. पहिल्या भेटीतच दोघांनी एकमेकांना पसंती दिली. नितीन आणि रेश्मा जोडीही छान दिसत होती. दोघेही एकमेकांना अनुरूप होते. यथावकाश योग्य मुहूर्त पाहून देशमुख आणि पाटील कुटुंबीयांनी त्यांचे लग्न करून दिले आणि रेश्मा सून म्हणून पाटील कुटुंबियांच्या घरी आली . सुरुवातीचे काही महिने छान गेले. नव्या सुनेचे कोडकौतुक झाले. पण नांतर घरात वादाला सुरुवात झाली. रेश्माची नणंद लग्न होऊन त्याच गावात राहत होती. तिचे सारखे घरी येणेजाणे सुरु असायचे. ती घरी आली की रेश्माची सासू आणि तिच्या तासनतास एका खोलीत गप्पा चालायच्या. घरामध्ये शेती आणि प्रॉपर्टीचे वाद सुरु झाले. रेश्माच्या नणंदेने आपल्या आईचे असे काही कान भरले की तिला सुरुवातीला आवडलेली ही सून घरात नकोशी झाली.





## आनंदी पहाट

### साधी व्याधी बरबादी ठरू नये

आधुनिक केसरी

आपल्या प्रत्येकाला प्रकृतीची काळजी घेणं जरुरीचं असतं. त्यासाठी आवश्यक ती पथ्य पाळणे देखील आवश्यक असतं. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या व्यग्र आणि व्यस्त दिनक्रमांत आपण दीनदुबळ्या अवस्थेलाच निमंत्रित करत असतो, हे नेहमीच विसरतो, अथवा त्याची जाणीव आपल्याला त्यावेळी होत नाही. अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीनही गरजांची पूर्तता करण्यासाठी अर्थार्जन अनिवार्य असतं. दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करून मिळवलेल्या पै पैशातून अन्न ग्रहण करणे काहीवेळा बाजूला राहतं, कारण अनेकदा ते दुर्लक्षित होतं. मुलभूत गरजांपैकी वस्त्र आणि निवारा ह्या दोन्ही गरजा महत्वाच्या असतातच पण त्याहीपेक्षा अधिक महत्वाची गरज म्हणजे अन्न होय. त्या अन्नाशिवाय कोणताही जीव जगूच शकत नाही. त्याची गरज शारीरिक स्वास्थ्यासाठी अधिक असते, आपल्या जगण्यासाठी असते. गरम, स्निग्ध, योग्य मात्रेत, पहिलं अन्न पचल्यावर, मनाला आवडेल अशा ठिकाणी सर्व योग्य सामग्रीसह, फार भरभर नाही आणि हळूही नाही, असं न बोलता हसत आनंदी वातावरणांत, जेवणाकडे पूर्ण लक्ष देऊन अन्न घ्यावं. आपल्या पचनक्रियेसाठी, शारीरिक स्वास्थ्यासाठी ते अत्यंत महत्वाचं, म्हणूनच अधिक जरुरीचं असतं. सद्यःस्थितीत धावपळीच्या युगात वेळी अवेळी काम करत राहावे लागते. त्यामुळे जेवणाच्या वेळाही वारंवार बदलतात. हल्ली अनेकांचा कल फास्टफूड खाण्याकडे आहे. फास्टफूड खाल्ल्यामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोगाचे विराट, अतिवजन वाढणे, किडनीवर परिणाम होणे असे आजार उद्‌भवतात. ह्याची आपल्याला ते खाताना जाणीवच रहात नाही. एखादी साधीच व्याधी झाली तरीही ती जीवनाची बरबादी ठरू शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**निष्काम कर्माचे | मोल जाण ||**

गोडवा वाणीत | रूजावा निखळ ||
अंतरी सोज्वळ | भाव नांदो ||१||
ज्याचे त्याचे भोग | प्रारब्धे भोगतो ||
कशास ठेवतो | नाव वेड्या ? ||२||
पापाचा तू धनी | नको होऊ जीवा ||
सात्विकांची सेवा | टाळू नको ||३||
करूनी विचार | करावी संगती ||
दांभिकांची निती | ओळखावी ||४||
जिभेवरी यावे | नाम विठोबाचे ||
निष्काम कर्माचे | मोल जाण ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**नेहमीच परिस्थिती एकसारखी राहत नाही. ती बदलते. कारण बदल हा निसर्गाचा नियम आहे. हा बदल सुसह्य व्हावा म्हणून परमेश्वराकडे प्रार्थना करावयास मात्र विसरू नकोस.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**क्षण क्षण योग वियोग है, जीव मोहनी जान ।**
**क्षण दुख क्षण सुख मिलत है, सो माया परमान ।।२३।। (स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/२३**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

प्रकृतीच्या प्रत्येक पदार्थांचा क्षणाक्षणाला योग-वियोग होत आहे आणि त्यापासून क्षणाक्षणाला दुःख-सुख प्राप्त होत आहे. हे सर्व मायेचं कार्य आहे. प्रकृती एक रूपात स्थिर राहू शकत नाही. त्यामुळे तिच्या योग-वियोगाने जीवांना दुःख-सुख प्राप्त होत आहे. म्हणूनच माया दुःखमय, अनित्य आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

मी पणामूळे समुहातील परस्परविरोधी गटतटाचे राजकारण सुरू होते. मनामध्ये सतत तिरस्काराची भावना निर्माण होते. म्हणून म्हणते मित्रांनो एक लक्षात ठेवणे गरजेचे आहे की कधीही मनाला मी पणा सापडू देऊ नका. कारण सगळ्या समस्याचे कारण मी पणात आहे. भगवंताला मी पणा अजिबात नाही . म्हणून मी पणाचा त्याग करावा. आपण पन्नासाव्या ओवीत पाहिले की 'मी पणाचा त्याग करावा 'पण मित्रांनो हा त्याग करणे वाटते तेवढे सोपे नाही. तर समर्थांनी या साठी तीन पाय-या सांगितल्या आहेत. 1)आपण जे कर्म करतो ते नीटपणे समजून घ्यावे. म्हणजे ऊदा,मी जर कुणाला काही मदत केली तर त्याचा अभिमान धरू नये. किंवा फार प्रोढी मिरवू नये. अरे तुझ्याकडून हे सत्कर्म घडले आहे तेव्हा समाधानी रहा तुझ्याशिवाय दुसरा कुणीही मदत करू शकतो ही भावना मनामध्ये कायम ठेव. अशा प्रकारे मी पणाचा त्याग करावा. 2 )परमार्थात परमेश्वर हा साक्षीभावाने बघत असतो हा विचार कायम लक्षात ठेवावा. ब्रम्हाशी तदाकार व्हावे. आपण स्वतः ब्रम्ह स्वरूप होऊन ब्रम्हाचा अनुभव घ्यावा. 3 )मी पणाने कोणत्याही द्रुष्य वस्तूत अडकू नये ऊदा,माझं घर,बंगला,शिक्षण,गाडी धनदौलत,किंवा महिला भगिनींचा आवडता विषय मी केलं सगळं म्हणून झालंअशा अहंकारात राहू नये. द्रुष्य वस्तूला चिकटून राहू नये. मी पणाचा त्याग करण्यासाठी विवेकाची गरज असते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## रिकामा वेळ सगळा भगवंताकडे लावावा

आधुनिक केसरी

साधारणपणे ज्या वस्तू देहाला सुख देतात त्या पुष्कळ मिळवणे हे आपल्या जन्माचे ध्येय आहे असे आपल्याला वाटते. परंतु अशा वस्तू ज्यांच्यापाशी पुष्कळ आहेत ती माणसे सुखी झालेली आढळत नाहीत. किंबहुना, अशा वस्तू जितक्या जास्त जमा कराव्या तितकी आपली हाव वाढतच जाते. पुढे वय झाल्यावर देह क्षीण होतो आणि त्याचे भोगण्याचे सामर्थ्य कमी होते. मग वस्तू असून देखील मनाची तळमळ कायम राहते. म्हणून शहाण्या माणसाने आत्तापासूनच आपले सुख बाहेरच्या वस्तूवर अवलंबून न ठेवण्याचा अभ्यास करावा. बाहेरची वस्तू सुटली तरी मनाला दुसरी वस्तू देणे अवश्य असते. अशी वस्तू म्हणजे भगवंत होय. भगवंत हा नेहमी राहणारा, स्वयंपूर्ण आणि आनंदमय असल्यामुळे त्याचे चिंतन करता करता मनामध्ये ते गुण उतरतात. अर्थात्, मन भगवंताच्या चिंतनाने आनंदमय बनल्यावर त्या माणसाचे जीवन किती रसमय होत असेल याची कल्पना करावी. आपल्यासारख्या व्यवहारी प्रापंचिक माणसांना चिंतन करण्यात एकच अडचण येते. ती म्हणजे व्यवहार आणि साधन यांची जोड घालणे. आपली अशी कल्पना असते की, भगवंताचे चिंतन



करणारा माणूस व्यवहार बरोबर करू शकत नाही. तुकारामबुवांसारख्या परमात्मचिंतनात बेभान झालेल्या पुरुषांची गोष्ट निराळी. आपल्यासारख्या माणसांना आपला व्यवहार अत्यंत बरोबर केल्यानंतर जो वेळ उरेल तितका भगवंताकडे लावला तर आपण फारच प्रगती केली असे म्हणता येईल. खरे पाहिले असता सध्या जेवढा रिकामा वेळ आपल्याला मिळतो तितका सगळा आपण भगवंताकडे लावत नाही. म्हणून दिवसातून काही वेळ तरी अत्यंत नियमाने भगवंताच्या नामस्मरणात घालवायचा आपण निश्चय करावा. नामाच्या आड सर्वच गोष्टी येतात, आपण स्वतःदेखील त्याच्या आड येतो, तेवढे सांभाळावे आणि जगाच्या नादी फारसे न लागता आपले नाम चालू ठेवावे. शिवाय, देवासंबंधीची फक्त संतांनी लिहिलेली पुस्तके रोज थोडी वाचावी, त्यावर मनन करावे, आणि ते आपल्या आचरणात कसे येईल याचा सूक्ष्म विचार करावा. अशा मार्गाने जो जाईल त्याची हां हां म्हणता प्रगती होईल आणि त्याला समाधान मिळेल.

**आजचे बोधवचन आहे - समाधान हीच खऱ्या आनंदाची खूण आहे.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

मोहरा होय तोचि अंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥२॥
तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥३॥
आलिंगनें घडे । मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥
ऐसा संताचा महिमा । जाली बोलायाची सीमा ॥ध्रु.॥
तीर्थे पर्वकाळ । अवघीं पायांपें सकळ ॥२॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १७ फेब्रुवारी २०२३

# सामाजिक भान असणारे असामान्य नेतृत्व

# वियजश्री खेचून आणणारे चाणक्य

आधुनिक केसरी

**आमदार श्रीकांत भारतीय यांनी महाराष्ट्रातील अठरा वर्षावरील मुलांचे पालकत्व स्वीकारुन त्यांचे सामाजिक पुनर्वसन करण्यासाठी 'तर्पण' फाऊंडेशनची स्थापना केली. दोन वर्षात तब्बल चारशेपेक्षा अधिक अनाथ मुलांचे पालकत्व स्वीकारण्याचे काम त्यांनी केले आहे. राजकीय क्षेत्रातील यशाची कमान चढती असताना सामाजिक भान असणारे भारतीय हे एकमेव असामान्य नेतृत्व. जन्मजात अनाथ झालेल्या मुलांना अठरा वर्षापर्यंत शासकीय निवारागृहात वाढवले जाते. मात्र अठरा वर्षानंतर बाहेर पडल्यानंतर करायचे काय? असा प्रश्न या मुलांसमोर उभा राहतो आणि ही संख्या राज्यासह देशात खुप मोठी आहे. स्वातंत्र्यानंतरच्या 75 वर्षात अठरा वर्षापुढील अनाथ मुलांच्या बाबतीत फारसा विचार झाला नाही. अनाथ मुलांसाठी नोकरीमध्ये एक टक्का आरक्षण आणि संजय गांधी निराधार योजनेंतर्गत अनाथ मुलांना महिना एक हजार रुपयांचे अनुदान देण्याचा सरकारकडून निर्णय करुन घेतला. या निर्णयामुळे अनाथांच्या जीवनात स्थैर्याचा किरण निर्माण होण्यास मदत झाली आहे. लोकांच्या सहभागातून अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी तब्बल एक कोटी रुपयांचा निधी शैक्षणिक फी म्हणून भरला. केवळ शैक्षणिक सुविधा देऊन नाही तर मुलांचे सामाजिक पुनर्वसन झाले पाहिजे यासाठी श्रीकांत भारतीय हे चारशे मुलांच्या पाठीमागे बाप म्हणून उभे राहिले आहेत. राजकीय क्षेत्रात काम करणारा कार्यकर्ता किती संवेदनशी असू शकतो याचे तर्पण फाऊंडेशन हे मानक झाले आहे.**

महाराष्ट्रासह देशभरात जन्मजात विविध कारणाने अनाथपण आल्यानंतर मुलांना शासकीय निवारागृहामध्ये ठेवले जाते. अठरा वर्षापर्यंत शिक्षणाची, राहण्या, खाण्याची सोय सरकारच्या वतीने होते. मात्र वयाची अठरा वर्षे पूर्ण होताच मुलांना शासकीय सुविधा बंद केल्या जातात. एकदम सुविधा बंद झाल्यानंतर आप्तेष्ठ फारसे जवळ करत नाहीत आणि मग करायचे काय? असा प्रश्न या मुलांसमोर उभा राहतो. शिक्षण कुठून करायचे, रहायचे कोठे? या समस्यातून मार्ग निघाला नाही तर मुलं वेगळ्या वाटेने जातात. समाज ही अशा मुलांकडे मानवतेच्या दृष्टीकोनातून बघण्याचे औदार्य दाखवत नाही. स्वातंत्र्यानंतरच्या 75 वर्षातही देशभरात अशा अठरा वर्षापूढील अनाथ मुलांसाठी सरकारची कोणतीच योजना, धोरण नाही. हीच बाब लक्षात घेऊन श्रीकांत व श्रेया भारतीय दाम्पत्याने दोन वर्षापूर्वी सृजनहेतूने तर्पण फाऊंडेशनची स्थापना केली. राज्यभरातील प्रत्येक जिल्ह्यात तर्पणचे संचालक नेमून त्यांच्यामार्फत अठरा वर्षावरील अनाथ मुलांची माहिती गोळा करत त्यांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी मदतीचा हात देण्यास सुरुवात केली. वारकरी सांप्रदायाचे अधिष्ठान आणि संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा प्रभाव असलेले श्रीकांत भारतीय यांनी अत्यंत आत्मीयतेने फेसबुकच्या माध्यमातून संवाद साधत समाजातील मदत करू इच्छिणाऱ्यांना आवाहन केल्यानंतर तर्पणसाठी अनेक हात सरसावले. तर सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या वेगवेगळ्या संस्था, कार्यकर्तेही तर्पण शी जोडले गेले. तेंव्हा अठरा वर्षावरील अनाथ मुला-मुलींच्या प्रश्नांची व्यापकता ठळकपणे समोर आली. दोन वर्षात तर्पण शी जोडल्या गेलेल्या मुला मुलींना त्यांच्या इच्छेनुसार शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश, राहण्याची सोय करुन त्यांचे सामाजिक पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्न केला जातो. तर्पणने शैक्षणिक फीस पोटी जवळपास एक कोटी रुपये भरले असुन त्यातुन अनेक मुले आता पदवीचे शिक्षण घेत असुन काही मुले तर स्पर्धा परीक्षेतून उत्तीर्ण होऊन सरकारी नोकरीमध्ये चांगल्या पदावर जात आहेत. शासकीय नोकरीत अनाथ मुलांना एक टक्के आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी श्रीकांत भारतीय यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आग्रह धरुन सरकारला निर्णय घ्यायला लावला. देशातील महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. अनाथांसाठी एक टक्का आरक्षण निश्चित केल्यामुळे अनाथ असलेली अनेक मुलांना सरकारी नोकरीची वाट सुकर झाली आहे. तर संजय गांधी निराधार योजनेंतर्गत अनेकांना प्रतिमाह हजार रुपयांचे मानधन मिळते. त्याच योजनेतून अठरा वर्षावरील अनाथ मुलांनाही प्रतिमाह एक हजार रुपयांचे अनुदान मिळाले पाहिजे यासाठी श्रीकांत भारतीय यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करुन हा निर्णयही घेण्यास भाग पाडले. त्यामुळे अनाथ मुलांना या अनुदानाचा खुप मोठा आधार मिळणार आहे. अनाथ मुलांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी यासाठी त्यांनी तर्पणच्या माध्यमातून चांगले काम करणाऱ्यांना पुरस्कारही सुरू केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण करुन सामाजिक पातळीवर या वर्गाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मुंबईत तर्पण साठी स्वतंत्र कार्यालय उभा करुन अनाथ मुलांना कोणत्याही वेळी अडचण आली तर थेट संपर्क करुन तत्काळ मदत केली जाते. तर्पणच्या माध्यमातून अनाथ मुलांच्या आयुष्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम श्रीकांत भारतीय यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात केले जात आहे. तर्पण च्या माध्यमातून केवळ शैक्षणिक फी भरणे, मदत करणे इतकेच नव्हे तर अनाथ मुलांचेही समाजात नाते निर्माण व्हावे यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. मुलांचे पालकत्व स्वीकारतांना त्यांच्या पाठीमागे बाप म्हणून उभा राहण्याची भूमिका श्रीकांत भारतीय यांनी घेतल्यामुळे तर्पणशी जोडलेली सगळी मुले भारतीय यांना 'बाबा' च म्हणतात. अशा पध्दतीने अनाथांशी आई-वडिलांचे नाते निर्माण करुन त्यांच्यासाठी अहोरात्र काम करणारे भारतीय दाम्पत्य एकमेव ठरले आहेत. तर्पण च्या कामामुळे श्रीकांत भारतीय यांची सामाजिक संवेदनशिलता अधिक ठळकपणे दिसते. अशा या सामाजिक भान असलेल्या राजकीय पटलावरील अनाथांच्या 'बापाला' जन्मदिनाच्या खुप शुभेच्छा..!



## आमदार श्रीकांत भारतीय वाढदिवस विशेष





आधुनिक केसरी

**आमदार श्रीकांत भारतीय यांच्यावर भारतीय जनता पार्टीने लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी महाविजयाचा संकल्प करुन निवडणूकीचे प्रभारी म्हणून जबाबदारी सोपवली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खास विश्वासू भारतीय हे मागील पस्तीस वर्षांपासून पक्षाचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून कार्यरत आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, युवा मोर्चा ते पक्षाचे प्रदेश महामंत्री असा चढता आलेख असलेले आ. भारतीय मागील दहा वर्षांपासून प्रदेश पातळीवर पडद्यामागील रणनितीकार म्हणून परिचित आहेत. सामाजिक भान, वारकरी सांप्रदायाचे अधिष्ठान, अभ्यासूवृत्ती, फर्डे वक्तृत्व, संवाद साधण्याची उत्तम कला आणि संघटनेसाठी समर्पित भावनेने काम करण्याची भूमिका यामुळे पक्ष पातळीवर वरिष्ठांपासून सामान्य कार्यकर्त्यापर्यंत त्यांच्याबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्यकारी अधिकारी असताना त्यांनी ग्रामीण भागात संघटन मजबूत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या पार्श्वभूमीवर त्यांची आगामी वर्षातील निवडणूका त्यांच्या नियोजनाखाली होणार असल्याने पक्षाला महाविजय मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाला आहे.**

महाराष्ट्र भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यकारीणीची बैठक नुकतीच नाशिक येथे पार पडली आणि पक्षाने 2024 च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी महाविजयाचा संकल्प जाहीर केला. लोकसभेसाठी 45 आणि विधानसभेसाठी दोनशे जागांचे लक्ष्य गाठण्यासाठी पक्षाने निवडणूक प्रभारी म्हणून विधान परिषदेचे आमदार श्रीकांत भारतीय यांच्यावर जबाबदारी सोपवली. तेंव्हापासून श्रीकांत भारतीय यांचा झंझावात सुरू झाला आहे. अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे शेतकरी कुटुंबात जन्मलेले श्रीकांत भारतीय यांनी वाणिज्य विभागातून पदवी मिळवल्यानंतर शेतकरी संघटनेचे प्रमुख म्हणून अनेक आंदोलनात नेतृत्व केले. महाविद्यालयीन जीवनापासूनच उत्तमपणे संवाद साधण्याची आणि बोलण्याची कला अवगत असल्याने 1985 पासून त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्ण वेळ कार्यकर्ते म्हणून कामाला सुरुवात केली. दिवंगत प्रमोद महाजन यांच्या वक्तृत्व शैलीचा प्रभार पडल्याने त्यांनी आपली वक्तृत्व शैली विकसित केली. त्यानंतर विदर्भ प्रदेश संघटनमंत्री म्हणून त्यांनी संघटनेत योगदान दिले. दरम्यान आसाम येथील अल्फा व बोडो चळवळीचा त्यांनी शास्त्रशुद्ध पध्दतीने अभ्यास केला. उत्तम वाचन आणि सहज संवाद ही त्यांच्या व्यक्तीमत्वाची वैशिष्ट्ये असल्याने त्यांनी काही काळ नागपूरमध्ये प्राध्यापक व पत्रकार म्हणून काम केले. मात्र स्वभावात चळवळीचा पिंड आणि संघटन कौशल्य असल्याने त्यांनी नोकरीचा राजीनामा देऊन थेट 1994 पासून भारतीय जनता पार्टीचे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून राजकीय प्रवासाला सुरुवात केली. संघटनेत पूर्ण क्षमतेने आणि झोकून देऊन काम करण्याच्या वृत्तीने त्यांची नागपूर शहर संघटन मंत्री नंतर विभागीय संघटनमंत्री पदी नियुक्ती झाली. मिळालेल्या पदाला पूर्णपणे न्याय दिल्यामुळे पक्षातील वरिष्टांचा विश्वास संपादन करण्यात ते यशस्वी ठरले. परिणामी त्यांची सन 2000 मध्ये युवा मोर्चाचे प्रदेश संघटनमंत्री पदी बढती झाली. पुणे विभागाचे संघटनमंत्री असताना त्यांनी राज्यभर भ्रमण करत विविध भागात तरुणांचे संघटन पक्षाशी जोडण्यासाठी विशेष प्रयत्न केले. प्राप्त परिस्थितीमध्ये मिळालेली जबाबदारी उत्तमपणे पूर्ण करण्याचा त्यांचा प्रत्यन त्यांच्याबद्दलचा विश्वास वाढवत गेला. तत्कालीन भाजपचे प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांच्या बरोबर संघटनेत काम करत असताना त्यांनी आपल्या कष्टातून फडणवीस यांचा विश्वास संपादन केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लढवलेल्या पहिल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र भाजप 'वॉर' रुमचे प्रमुख म्हणून त्यांनी काम केले. विधानसभा निवडणुकीत निवडणूक व्यवस्थापन समिती समन्वयक म्हणून त्यांनी उत्तम काम केले. भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून श्रीकांत भारतीय यांनी पाच वर्ष काम केले. ग्रामीण भागात पक्षाला मजबूत करण्यासाठी सरपंचापासून ते सहकारी संस्था, सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत त्यांनी मजबूत बांधणी केली. परिणामी नंतरच्या निवडणुकांमध्ये ग्रामीण भागात पक्षाला बळकटी मिळाली. विशेष कार्यकारी अधिकारी असताना त्यांच्या दालनात सामान्य माणसाला थेट प्रवेश आणि राज्याच्या कानाकोपाऱ्यातील कामासाठी त्यांचा थेट संपर्क यामुळे श्रीकांत भारतीय यांचा राज्यभर परिचय झाला. भाजप प्रदेश महामंत्री म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी आल्यानंतर त्यांनी प्रदेश पातळीवर संघटनेला अधिक लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्न केले. आधुनिक प्रसार माध्यमांचा वापर करत फेसबुकवरुन संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अभंगावर प्रवचने आणि राजकीय विश्लेषणांचा राज्यभरात एक चाहता वर्गच निर्माण झाला. कुटुंबात वारकरी सांप्रदायाचे अधिष्ठान असल्याने त्यांचा राज्यभरातील धार्मिक संस्था, गडांशी जवळचा स्नेह आहे. विशेष कार्यकारी अधिकारी असताना सामाजिक संस्था आणि शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून त्यांनी 'निर्मलवारी' अभियान राबवून पंढरपुरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या संत तुकाराम, ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी मार्गावर स्वच्छतागृहांची निर्मिती केली. निर्मलवारी टीममधील पंधरा हजार स्वयंसेवकांना शासकीय पाठबळ उभे करुन पंढरपुरातील वाळवंटही स्वच्छ ठेवण्याची किमया केली. तर पावसात वारकऱ्यांना रेनकोटचे वाटप केले. श्रीकांत भारतीय यांच्या नेतृत्वाखालील निर्मलवारीने पालखी मार्गावरील गावे दुर्गंधीमुक्त झाली. तर वारीतील महिलांची कुचंबना दूर झाली. प्रशासनात लोकांची काळजी घेणारा दृष्टा अधिकारी असेल तर काय होऊ शकते याचे निर्मलवारी हे उत्तम उदाहरण ठरले आहे. सामाजिक भान, वारकरी सांप्रदायाचे अधिष्ठान आणि संघटनेसाठी प्रामाणिकपणे काम करण्याच्या भूमिकेमुळे श्रीकांत भारतीय सुपरिचित झाले असुन त्यांच्याकडे आता आगामी सार्वत्रिक निवडणुकातील महाविजय संकल्पाच्या नियोजनाची जबाबदारी आली आहे. निवडणुकानंतर सर्वच पक्ष दावे, प्रतिदावे करतात तेंव्हा 'आकड्यांचे सत्य' हे त्यांचे विश्लेषण अधिक प्रभावी राहिले आहे. महाराष्ट्रातून दिवंगत प्रमोद महाजन हे राष्ट्रीय पातळीवर निवडणुकांचे रणनितीकार म्हणून ओळखले जात होते. याच धर्तीवर महाराष्ट्राच्या निवडणुकीत श्रीकांत भारतीय यांची ओळख निर्माण होऊ लागली आहे. श्रीकांत भारतीय यांच्यातील कार्यक्षमता ग्रामीण भागातील थेट कनेक्ट, पक्ष श्रेष्ठींचा विश्वास व उत्तम संघटन कौशल्य यामुळे आगामी निवडणुकीत पक्षाने ठरवलेले लक्ष्य गाठण्यात श्रीकांत भारतीय यांचे नियोजन महत्वपूर्ण ठरणार हे मात्र निश्चित.

## पुजाराचे अभिनंदन

आधुनिक केसरी

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात दिल्लीच्या मैदानावर खेळला जाणारा बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीचा दुसरा कसोटी सामना भारतीय फलंदाज चेतेश्वर पुजारासाठी  खूप खास ठरला आहे. भारतासाठी कसोटी फॉरमॅटमध्ये 100 कसोटी सामने खेळणारा तो 13वा भारतीय खेळाडू ठरला आहे. 2010 मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिली कसोटी खेळल्यानंतर पुजाराने स्वत:ला कसोटी संघातील एक महत्त्वाचा खेळाडू बनवले. योगायोगाने तो आपला पहिला आणि 100 वा सामना कांगारुविरुद्धच खेळत आहे. चेतेश्वर पुजाराने आतापर्यंत कसोटी फॉर्मेटमध्ये एक स्पेशालिस्ट फलंदाज म्हणून स्वत:ला सिद्ध केले आहे. 100 व्या कसोटी सामन्याच्या निमित्ताने त्याचं संपूर्ण कुटुंब देखील मैदानावर उपस्थित असून भारताचे माजी दिग्गज क्रिकेटर सुनील गावस्कर यांनी सामना सुरू होण्यापूर्वी पुजाराला स्मृतिचिन्ह देऊन या ऐतिहासिक प्रसंगी त्याचे अभिनंदन केले. यादरम्यान, अनेक माजी दिग्गज खेळाडूंशिवाय, सध्याच्या खेळाडूंनीही पुजाराचे सोशल मीडियाद्वारे त्याच्या या कामगिरीबद्दल अभिनंदन केलं आहे. चेतेश्वर पुजाराचे त्याच्या 100 व्या कसोटी सामन्याबद्दल अभिनंदन करताना महान फलंदाज सचिन तेंडुलकरने लिहिले की, पुजाराचे टीम इंडियासाठी 100 कसोटी सामने खेळल्याबद्दल खूप खूप अभिनंदन. हा खूप खास क्षण आहे. तुम्ही देशासाठी तुमची सर्वोत्तम कामगिरी देत राहा. आयसीसीनंही खास फोटो पुजारासाठी पोस्ट केला आहे. ऑक्टोबर 2010 मध्ये टीम इंडियासाठी पदार्पण करणाऱ्या चेतेश्वर पुजाराने आतापर्यंत करिअरमध्ये एकूण 99 कसोटी आणि 5 एकदिवसीय सामने खेळले आहेत. कसोटीच्या 169 डावात फलंदाजी करताना त्याने 44.15 च्या सरासरीने 7021 धावा केल्या आहेत. यामध्ये त्याने एकूण 19 शतके आणि 34 अर्धशतके केली आहेत. त्याच वेळी, त्याची सर्वोच्च धावसंख्या नाबाद 206 धावा आहे. याशिवाय एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याने 51 धावा केल्या आहेत.

## खान्देशी मातीतले मौल्यवान मोती : रंजन खरोटे



डी. बी. जगत्पुरिया
संपर्क 9860485398

आधुनिक केसरी

**विख्यात विडंबनकार, नाटककार, व्यंग-चित्रकार, पत्रकार, तपस्वी प्रबोधनकार, अध्यापक रंजन खरोटे आबांचे चालता बोलता सोडून जाणे काळीज पिळवटून टाकणारे होते! अनेकांनी हे क्रूर-कटू वृत्त ऐकताच हंबरडे फोडले. माझ्या हृदयात त्यांच्यासाठी भावापेक्षाही मोठी जागा होती. सदर लेख लिहित असतांना मी वियोगाच्या असह्य वेदनेने सुन्न आहे! दररोज त्यांच्याशी बोलणं व्हायचं. कधीही कुठल्याही वेळी संवाद करण्यासाठी उपलब्ध असणारा, जीवाला जीव देणारा मित्र कुठे लुप्त झाला? काही महान लोक दोन-तीन मोबाईल ठेवतात पण एकही उचलत नाहीत. आता कुणाशी बोलाव? त्यांनी अनेक प्रकल्प आखले होते. त्यांना खूप लिहायचे होते. भरपूर जगायचे होते. पण एका क्षणात हृदयगती थांबली.**

द्वेषाधीश, दोषाधीश खूप असतात. पण एवढे असंख्य गुण एकवटलेला माणूस दुर्मिळ असतो. 1974 मध्ये प्राचार्य पी.बी. सांगळे यांच्या पारखी निर्णयामुळे खरोटे सर, मी, सी. के. मिस्तरी कालिका विद्याप्रसारक संस्था, शिरुड संस्थेत लागलो. स्नेहाच्या वीणेमुळे मैत्री घट्ट झाली. खरोटे सरांची व माझी नाटकं, एकांकिका रंगमंचावर प्रस्तुत झाल्या. रंग-तरंग कलापथक खूप गाजले. सी. के. मिस्तरीच्या सुमधूर आवाजाचा शोध लागला. हा आवाज आजही शाबूत आहे! आबांच्या जाण्याने संगीत क्षेत्रातल्या पी.एस. आप्पा वाणी, भास्कर देवरे, सुरेश देवांग वाल्मिक महाराज, गोकूळ कासार इ. अनेकांची आठवण उजळून निघाली.

सामान्य कुवतीचा शिक्षक पाट्या टाकून पगाराची वाट बघत असतो. मध्यम प्रतीचा शिक्षक थोडंफार विश्लेषण करतो. प्रेरणा उत्तेजना देणारा शिक्षक विद्यार्थ्यांचं जीवण घडवतो. अफाट ऊर्जा देत असतो. खरोटे सर मराठी-हिन्दीचे निष्णात अध्यापक होते. त्यांनी अनेक पिढ्या घडवल्या. अंधश्रद्धा निर्मूलनाचे 'बाबा घेतो ताबा' चे अनेक प्रयोग करून ते लोकशिक्षक, जनाध्यापक झाले होते! काही लोक नाहीचा बाप असलेला 'हो' म्हणतात. सरांनी आपल्या शब्दकोषातून 'नाही' हा शब्द हद्दपार केला होता. म्हणूनच ते आपल्याजवळ असलेली गुणवत्तेची सत्त्वशील शिदोरी उदार मनाने वाटत राहिले. ते चैतन्ययात्री होते. त्यांच्या उपस्थितीने मरगळ नष्ट व्हायची.

खरोटे सर अभिनेते-दिग्दर्शकही होते. एक प्रसंग आठवतो. गोंदेगाव ता. सोयगाव जि. औरंगाबाद येथे मी लिहिलेल्या व दिग्दर्शित केलेल्या 'चुडेदान' या तीन अंकी नाटकाचा प्रयोग व्हायचा होता. सरस्वती भुवन हायस्कूलचे आम्ही माजी विद्यार्थी हा नाट्यप्रयोग सादर करणार होतो. त्यातील 'सुहास' या खलनायकाची भूमिका करणारे कलावंत दूर नोकरीला असल्याने येऊ शकले नाहीत.

नाटक सत्य घटनेवर आधारित असल्याने अफाट गर्दी लोटेल हे माहित होतं. त्यावेळी मोबाईल नव्हता. खरोटे सर स्वतःच म्हणाले, काळजी करू नका, मी पात्र उभं करून नाटक यशस्वी करीन. त्यांनी केवळ प्रॉम्प्टिंगवर खलनायक असा उभा केला की, प्रेक्षकांना काही कळलं नाही. त्यांची अभिनयक्षमता सिद्ध झाली! असे मुरब्बी कसलेले अभिनेते होते खरोटे सर! अभिनयाचे ते बेबंद बादशहाच होते!! नंतर या नाटकाचे बरेच प्रयोगही झाले. सिनेमाकडे वळले नसते तर सर नक्कीच नटश्रेष्ठ म्हणून गणले गेले असते!

प्रखर बुद्धीप्रामाण्य असल्याशिवाय, कर्मकांड नाकारल्याशिवाय अंधश्रद्धेवर हल्लाबोल करता येत नाही! ते कला शाखेचे अभ्यासक होते तरी प्रखर विज्ञानवादी होते. नेत्रदान, देहदान, अवयवदान करायला माणूस निर्भय, भक्कम दृढ विचारांचा असावा लागतो.



प्रबोधनकार ठाकरे साहेबांच्या-

**''धर्मावाचून**
**प्राण न जाई,**
**देवाविन नच अडते**
**आत्मशक्ती खंबीर तयांच्या**
**त्रिभूवन पाया पडते.''**

या धाडसी ओळी अक्षरशः जगून दाखवल्या! या ओळी झणझणीत अंजन घालणाऱ्या आहेत. पचायला जड आहेत. त्यांनी अंधश्रद्धेत जखडलेल्या झापडनंद शिक्षितांना ठणकावत जागवलं! भंपक भोंदू बाबांना उघडं पाडलं!! सरांनी तानाजी शिंदे नावाचा एक दमदार वारसदार तयार करून ठेवलाय. तो स्वतंत्र कार्यक्रम सादर करतो. शिंदे सरांचा पुत्रवत शिष्य !

खरोटे सरांची व्यंगचित्रे खूप धारदार झाली होती. सत्तालंपट सत्ताधाऱ्यांच्या बरगड्या ते आपल्या कुंचल्यातून मोडून टाकायचे, घणाघात करायचे.

**''व्यंगचित्रांच्या धनुष्याने**
**मस्तवाल वाकवता येतो**
**निशाणा लागला की**
**उर्मठ झुकवता येतो!''**

एवढे सामर्थ्य कुंचल्यात होते. ते गीतकार होते, गायक होते. एवढे गुण असुनही हा माणूस कमालीचा विनयशील होता, बोलणं, हितगुज करणं त्यांना आवडायचं. जगदीश देवपुरकर, रावसाहेब गरुड, रामदास वाघ, जगतराव सोनवणे, राधेशाम वर्मा, कॉ. मनोहर पाटील, प्राचार्य जे.जी. खैरनार, नथ्थुभाऊ गुजर, आत्माराम बापू पाटील, दिपक निकम, प्रभाकर गुरव इ. अनेक दिग्गज लोकांशी त्यांचा निकटचा स्नेह होता. धुळे जिल्हा ही त्यांची वंदनीय ऊर्जाभूमी होती.

'बेबंदशाहीचा बेबंद बादशहा' हे त्यांचे खळखळून हसवणारे स्त्री पात्र विरहीत वगनाट्य. जगदीश देवपूरकरांनी त्याचे काही प्रयोग केले. त्यांनी एकांकिकाही लिहिल्या. विनोद आणि प्रखर विज्ञानवादी विचारांचा समन्वय त्यांच्या व्यक्तित्वात होता. ''जीवन म्हणजे अनंत आव्हानं, प्रदीर्घ साहस आणि पात्रतेची कसोटी!'' असे प्रेरक विचारही खरोटे सरांनी 'ज्ञान-धन' या आपल्या पुस्तकातून दिले आहेत. त्यांनी लिहिलेली गीतेही खूप चर्चित झाली. वैभवी शब्दांची श्रीमंती ते सर्जनाच्या रथातून मिरवित राहिले! अक्षरांच्या डोळ्यांनीच त्यांनी या समाजातील नागडे सत्य पाहिले !

अनेकांना हवाहवासा वाटणारा हा कामाचा माणूस अचानक सोडून गेल्याने त्यांची अफाट मित्रसृष्टी व्याकुळ झाली आहे. या वयातही तंदुरुस्त असलेले आबा जाऊच कसे शकतात? या प्रश्नाने त्यांचं डोकं-मन वैतागलं आहे. उच्चभ्रू अभिजनवर्गाने अशा गुणवंत माणसाची दखल का घेतली नाही? हे वास्तव असलं तरी त्यांनी याची कधीच खंत बाळगली नाही. कथाकथनही ते उच्च दर्जाचे करायचे. श्रोत्यांना जागेवरच खिळवून ठेवायचे ! किती आठवणी सांगाव्यात? किती नोंदवावं? त्यांचे अप्रकाशित लेखन समोर येण्यासाठी प्रयास करावा लागेल.

सौ. रजनी वहिनी गेल्यानंतर ते खूप हादरले होते. त्यावर त्यांनी अंगभूत क्षमतेने मात केली. लेखनात गुंतवून घेतलं. चि. दर्शन, नरेन्द्र, राजन या कर्तबगार मुलांनी त्यांची खूप सेवा केली. सुनाही काळजी घेतात असं ते सांगायचे. नातवंडं त्यांना खूप आवडायची. प्रख्यात कवी विनय मिराशे म्हणतात,

**''जीवन म्हणजे श्वासासंगे इमान असते राजा,**
**आचाराची-विचाराशी कमान असते राजा!''**

यातील मर्म समर्थपणे आबांनी पेललं खान्देशी मातीतील या मौल्यवान मोतीला विनम्र अभिवादन !

## सरासरी दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**संपूर्ण जगातील सर्व देशांचे सकल देशांतर्गत उत्पादन एकूण सुमारे 100 लाख कोटी डॉलर्स आहे. यामध्ये भारताचा वाटा केवळ 3.50 टक्के आहे, म्हणजे भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन सुमारे 3.50 लाख कोटी डॉलर आहे. तर, संपूर्ण जगातील 17.5 टक्क्यांहून अधिक लोक भारतात राहतात. लोकसंख्येच्या तुलनेत भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन खूपच कमी आहे. आता सकल देशांतर्गत उत्पादन वाढविण्यासाठी केंद्र सरकार आणि अनेक राज्य सरकारे  पूर्ण समर्पणाने काम करत आहेत. मात्र, संपूर्ण जगामध्ये जीडीपीच्या बाबतीत भारत पाचव्या क्रमांकावर आला असून आता फक्त अमेरिका, चीन, जपान आणि जर्मनी हे देश त्याच्यापुढे आहेत. परंतु, मोठ्या लोकसंख्येमुळे, भारतातील दरडोई उत्पन्न इतर अनेक देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे.**

प्रत्येक भारतीयाचे सरासरी उत्पन्न प्रति वर्ष 2,200 डॉलर आहे, तर अमेरिकेमधील सरासरी दरडोई उत्पन्न 70,000 डॉलर प्रति वर्ष आहे आणि चीनची लोकसंख्या भारतापेक्षा जास्त असूनही प्रत्येक चीनी नागरिकाचे सरासरी उत्पन्न 12,000 डॉलर प्रतिवर्ष आहे. अशाप्रकारे आता देशातील सरासरी दरडोई उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यामध्ये भारताच्या युवाशक्तीचे योगदान आवश्यक झाले आहे.

आज कोणत्याही देशासाठी जास्त लोकसंख्या आणि त्यात तरुण लोकसंख्येचा जास्त सहभाग ही त्या देशासाठी अतिशय फायदेशीर गोष्ट मानली जाते. आज विशेषतः जपान, जर्मनी, अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, चीन, कॅनडा इत्यादी अनेक विकसित देशांमध्ये जन्मदर कमी झाला आहे आणि या देशांमध्ये प्रौढ नागरिकांची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे आणि तरुण लोकसंख्येची कमतरता जाणवत आहे. त्यामुळे युवा वर्गाची उपस्थिती महत्त्वाची मानली जाते. अशा प्रकारे तरुण लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून भारत खूप फायदेशीर स्थितीत आला आहे. भारताच्या एकूण 140 कोटी लोकसंख्येपैकी 50 टक्के लोकसंख्येचे वय 25 वर्षांपेक्षा कमी आहे आणि 65 टक्के लोकसंख्येचे वय 35 वर्षांपेक्षा कमी आहे. बहुतेक तरुण, म्हणजे 60 कोटी भारतीय नागरिक 18-35 वयोगटातील आहेत. भारतीयांचे सरासरी वय केवळ 29 वर्षे आहे, तर चीनमधील नागरिकांचे सरासरी वय 37 वर्षे आणि जपानच्या नागरिकांचे सरासरी वय 48 वर्षे आहे. त्यामुळेच भारताला तरुण देश म्हटले जात असून आज संपूर्ण जगाचे डोळे भारताकडे लागले आहेत. आता अशी परिस्थिती दिसू लागली आहे की भारताने जर आर्थिक प्रगती केली तर संपूर्ण जग आर्थिक प्रगती करताना दिसेल.

आज भारतातील साक्षरता दर 80 टक्क्यांच्या आसपास पोहोचला आहे, जो खूप चांगला दर म्हणता येईल. मात्र, शहरी आणि ग्रामीण भागातील तरुणांमध्ये शिक्षणाची पातळी वेगळी दिसून येते. त्यामुळे भारतातील तरुणांमध्ये कौशल्याचा अभाव असल्याने देशाच्या आर्थिक विकासात त्यांचे योगदान समाधानकारक पातळीवर होत नाही. भारतातील तरुणांमधील शिक्षणाचा स्तर अधिक सुधारण्यासाठी अलीकडे भारतात अनेक नवीन उच्च शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. आता नवीन शैक्षणिक धोरणही येऊ घातले आहे.



भारतातील सुशिक्षित तरुण अनेक विकसित देशांमध्ये पोहोचत आहेत आणि तंत्रज्ञान, औषध आणि व्यवस्थापन क्षेत्रात आपली सेवा देत आहेत आणि या देशांतील अनेक खाजगी संस्था एक प्रकारे भारतीय चालवत आहेत. आज अनेक आखाती देशांमध्ये तसेच जपानमधील रुग्णालयांमध्ये भारतीय परिचारिकांना मोठी मागणी आहे. केंद्र सरकारच्या धोरणांमुळे ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, जपान, कॅनडा, अमेरिका, जर्मनी आणि आखाती देश आता भारतीय वंशाच्या नागरिकांवर विश्वास ठेवून त्यांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात पुढे नेण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. आज गरज आहे की, देशातील तरुणांनी पुढे येऊन केंद्र आणि राज्यांच्या विविध योजनांचा लाभ घेऊन देशाच्या विकासात आपले योगदान वाढवावे, त्यांच्यातील कौशल्ये विकसित करावीत, जेणेकरून भारताला विकसित राष्ट्रांच्या श्रेणीमध्ये आणता येईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अग्रगण्य मराठी दलित लेखिका!




श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**दुर्गा भागवत या लोकसंस्कृती आणि लोककलेचे संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी सुरेख लेखनही केले आहे. त्यांना बौद्ध अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ म्हणूनही ओळखले जाते. जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकौशल्यांची ज्ञानवर्धक माहिती श्री.एन. कृष्णकुमारजींच्या या शब्दशैलीतून...**

दुर्गा नारायण भागवत या भारतीय विद्वान व समाजवादी लेखिका होत्या. त्यांनी संस्कृत आणि बौद्ध साहित्याचा अभ्यास करून आदिवासी जीवनाचा अभ्यास करण्यासाठी मध्य प्रदेशातील जंगलात वेळ घालवला. नंतर त्या संशोधक म्हणून मुंबईत परतल्या आणि मराठीत पुस्तके लिहिली. मराठीतील त्या अग्रगण्य महिला दलित लेखिका आहेत. आणीबाणीला विरोध करणाऱ्या प्रमुख लेखकांपैकी त्या एक होत्या. आज त्या नवलेखिकांच्या प्रेरणास्रोत ठरत आहेत. पद्मश्री आणि ज्ञानपीठ यांसारखे संस्थात्मक आणि नागरी सन्मान स्वीकारण्यापासूनही त्यांनी स्वतःला दूर ठेवले. दुर्गा भागवतजी यांची काही प्रसिद्ध पुस्तके अशी- १ )ॲन आउटलाइन ऑफ इंडियन फोकलोअर २ ) रिडल इन इंडियन लाईफ ३ ) लोअर अँड लिटरेचर ४ ) अ डायजेस्ट ऑफ कंपरेटिव्ह फिलॉलॉजी ५ ) रोमान्स इन सॅक्रिड लोअर ६ ) अ प्रायमर ऑफ अँथ्रॉपॉलॉजी ७ ) अर्लि बुद्धिस्ट ज्युरिस्प्रुडन्स इत्यादी इंग्रजी ग्रंथ, तर ८ ) हेन्री डेव्हिड थोरो यांच्या ग्रंथांचे मराठी अनुवाद- पैस ९ ) व्यासपर्व १० ) डूब ११ ) ऋतुचक्र १२ ) महानदीच्या तीरावर १३ ) पूर्वा १४ ) रूपरंग १५ ) लोक साहित्याची रूपरेखा १६ ) धर्म व लोकसाहित्य १७ ) भावमुद्रा १८ ) केतकरी कादंबरी १९ ) प्रासंगिका आणि २० ) जनतेचा सवाल आदी मराठी पुस्तके आहेत.



दुर्गा भागवत या लोकसंस्कृती आणि लोककलेचे संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी सुरेख लेखनही केले आहे. त्यांना बौद्ध अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ म्हणूनही ओळखले जाते. दुर्गा भागवतजींचा जन्म दि.१० फेब्रुवारी १९१० रोजी इंदूर येथे झाला. त्यांचे शिक्षण मुंबई, अहमदनगर, नाशिक, पुणे अशा विविध ठिकाणी झाले. त्यांनी मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून सन १९३२मध्ये बीए परीक्षा उत्तीर्ण केली. पुढे सन १९३५ साली त्यांनी एमएची पदवी संपादन केली. शिक्षण घेत असतानाच त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतही भाग घेतला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर दुर्गाजींनी पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्समध्ये समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून दोन वर्षे काम केले. काही दिवसांनी त्यांनी 'साहित्य सहकार' या मासिकाचे संपादनही केले. त्यांनी लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्र या विषयांवर विपुल प्रमाणात संशोधनात्मक लेखन केले आहे. या विषयांवरील त्यांचे बरेचसे ग्रंथ इंग्रजीमध्ये आहेत. त्यांनी वैचारिक व समीक्षात्मक लेखनही केले आहे.

साने गुरुजींच्या प्रेरणेतून त्या ललित लेखनाकडे वळल्या आणि आपल्या ललित लेखनाद्वारे त्यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली. दुर्गा भागवत स्वलेखनाच्या कट्टर पुरस्कर्त्या आहेत. त्यासाठी त्यांनी आणीबाणीच्या काळात सन १९७५-७७मध्ये कारावासही भोगला होता. साहित्यिक व विचारवंत यांनी शासकीय पुरस्कार स्वीकारून शासनाचा मिंधेपणा पत्करू नये, असे त्यांचे ठाम व करारी मत होते. अनेक सामाजिक चळवळींतही त्यांचा सहभाग आहे. त्यांच्या 'पैस' या ग्रंथाला 'साहित्य अकादमी' पुरस्कार लाभला आहे. सन १९७५मध्ये कराड येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. अभिजात रसिकता, सौंदर्यासक्ती, जीवनोत्सुक आशाप्रवण वृत्ती, तीव्र संवेदनशीलता, काव्यात्मकता व मर्मग्राही कुतूहल यांचे अपूर्व रसायन त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असून त्यांच्या साहित्यातही त्याचे प्रतिबिंब पडले आहे. या सर्वांना त्यांचा सखोल व्यासंग व मार्मिक विश्लेषण यांची जोड मिळाली आहे; त्यामुळे त्यांच्या लेखनाला एक आगळा आशय व प्रगल्भता प्राप्त झाली आहे. दुर्गा भागवतजी यांचे निर्वाण दि. ८ मे २००२ रोजी मुंबई येथे झाले. त्यांचे साहित्य आज महिला साहित्यिकांना प्रचंड ऊर्जा पुरवित आहे, हे येथे उल्लेखनीय!

# गेले ते दिवस उरल्या फक्त आठवणी



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**हरवलेल्या एखाद्या क्षणी येतात उफाळूनी. आज हे चित्र पाहिले आणि का कोण जाणे! तिची आठवण झाली. हातामध्ये पाणी घेवून, डोक्यावरच्या पदराचा काठ दोन्ही हातात चोळून तर्जनी आणि मधल्या बोटाच्या साहाय्याने व्यवस्थित डोक्यावर बसवत असताना, आणि हे सार करताना तिच्या त्या दोन्ही हातातल्या दोन दोन डझन बांगड्या स्मित हास्य केल्यासारखा त्याचा तो खळ खळ आवाज नकळत कानात घु मु लागला. हरवलेल्या एखाद्या क्षणी येतात उफाळूनी. आज हे चित्र पाहिले आणि का कोण जाणे! तिची आठवण झाली. हातामध्ये पाणी घेवून, डोक्यावरच्या पदराचा काठ दोन्ही हातात चोळून तर्जनी आणि मधल्या बोटाच्या साहाय्याने व्यवस्थित डोक्यावर बसवत असताना, आणि हे सार करताना तिच्या त्या दोन्ही हातातल्या दोन दोन डझन बांगड्या स्मित हास्य केल्यासारखा त्याचा तो खळ खळ आवाज नकळत कानात घु मु लागला.**

ते दोन मोठाले जोते, ती भली मोठी दगडी चौकट पितळेच्या त्या गोल कडया असलेलं ते मोठाच्या मोठं दार आणि दारमागे असलेला आडणा दरवाजात असलेल्या त्या दहा बारा दगडी फरश्या आणि तिथून पुढं असणार शेणाने सारवलेल अंगण आणि त्याच अंगणात डौलाने दिमाखात उभी असलेली ती . टवटवीत तुळस तिच्या भोवतीची ती रांगोळी आणि तिन्ही सांजेला तुळशीत मंद तेवनारी निरांजन आज किती सहजपणे डोळ्यासमोर उभी राहिली.

हिवाळ्यात उगवतीच्या दारातून हळुवार सावकाश येऊन उतरलेलं ऊन पहिलं त्याचं जोत्यावर पहिलं यायचं,आणि तिथल्या त्या दोन तीन दगडी पायऱ्यांवर अलवार विसवावयाच मागलदारच्या अंगणातल्या बाभळी च्या पिवल्या फुलांचा नि पानांचा पडलेला हिरवा पिवळा सडा,झाडाच्या बुंध्याजवळ पसरून मागल दाराच्या त्या फोफात्यात लोळत पडल्यासारखा वाटायचा. श्रावणात मावळतीच्या वेळेला एखादी सर कोसळून गेली की कौलारू घरातून निघणारा आमच्या घरातला धूर आणि त्यात नाना काकाच्या घरातला धूर ही त्यात मिसळायचा.आणि एकत्र कुटुंबाचा आनंद देवून अगदी साऱ्या अंगणभर भरुन जायचा. आषाढ संपून गेल्यानंतर श्रावणात कितीतरी दिवसानंतर पडलेलं ते पहिल्या उन्हं ची साक्ष तेच अंगण द्यायच विचित्र पद्धतीत अंगठा आणि करंगली च्या विचित्र पद्धतीत टाळ वाजवत येणारा वासुदेव त्याचा टाळ आणि टाळाच्या सुरात अडकलेलं ते गाणं अंगणातल्या कणा कणात मिसळुन हरवलेल्या क्षणात आजही ऐकायला येते. पोराबलांसाठी दुवा मिळाव्या म्हणून वासुदेव ला सुपातून वाढलेलं धान्य, थंडीच्या दिवसांत येणारा अस्वल वाला ही का कोण जाणे कधीतरी डोळ्यासमोर येतो.

शेणाने सारवल्यांनंतर तुळशवृंदावन भोवती ची रांगोळी आणि रांगोलीतले आणि जीवनातले ते रंग....

उन्हाळ्यात वाड्यातल्या आतल्या अंगणात चुलत्या मा सोबत झोपल्यानंतर मागल दारच्या बाभळी मागचा तो मध्यरात्रीचा चंद्र आणि चांदणे त्या प्रेमाची साक्ष



देत पहाटेच्या पाराला गायब होऊन जायचा. कधीतरी मधी आधी पडलेल्या चांदण्याच्या प्रकाशात घराच्या पडलेल्या अंगणातल्या त्या विचित्र सावल्या कधीतरी भीती दाखवायच्या आणि कधीतरी खूप हव्याशा वाटायच्या. उन्हाळी पावसात सारवलेल्या अंगणात वळचनी गळून पडलेले खड्डे त्याच्या भोवतालचा शेणाचा तो शेणसडयाच्या खड्डयात आणि चांदण्याच्या त्या विचित्र सावल्यात गुंगलेल बालगोपाल पाहून डोळ्याचं तिच्या पारणं फिटायाचं.

अंगणातल्या कॉटवर लोळत लोळत झालेला तो गोपाळ काला, आकाशातल्या चांदण्यात जणू मिसळून जायचा नी मग माजघरातल्या फोडणीचा आवाज आणि वास साऱ्या आंगण भर दरवळायचा मग बाळ गो पालांच्या पोटातल्या कावळ्याना मग आपोआप भूक लागायची. नि मग तृप्तीने दिलेला ढेकर तिच्या काळजा ला सुखावून टाकायचा.

जत्रेला आलेली आत्या अन् 'वन्स वन्स' चा घुमलेला आवाज, सुगीच्या दिवसात बैलांच्या पायावर ओतलेल पाणी त्याच्या कपाळावरच ते हळदी कुंकू, लावून त्याच्या पाठीवरून फिर लेला सुनेचा तो मायेचा हात आणि बैलाच्या गळ्यातला घुंगराच्या आवाजा न भरवलेल आंगण.... पाहून तिच्या आनंद अश्रूंना आलेले उधाण आजही डोळयात दिसते.

कपिला च्या दिगू च्या आवाजाने भरुन गेलल ते अंगण आणि हळू हळू दिगू ची ती वळालेली पाऊले.... आणि दिगुनंतर कपिलाची हि नकळत नाहीशी झालेली ती सावली... या आणि अशा अनंत आठवणी ...नंतर हवेत विरुन गेलेल्या काही स्मृती.... तिचं भरलेलं गोकुळ प्रत्येक दिवसाची कितीतरी स्मरणे आहेत.ही स्मरण वाट कितीतरी खोल जाते.तिच्या काळजाच्या काळीज कप्प्यात....

भरलेलं गोकुळ काळाच्या ओघात रित होत गेलं, आठवणीची धूळ मागे ठेवत वाटावाटानीं पांगल,कधीतरी आवसच्या त्या अंधारातल्या चांदण्या सारखं चमचम करीत सय बनून येत तर कधी पूनवच्या त्या चांदण्यात येवून मायेनं अंगाला बिलगत,
पण आज... ?

....जोत्यावर बसून सांगावा धाडलेल ते पाखरू त्या आसक्तरुपी डोळ्यात दूर दूरवर उडताना, जिथं वर नजर पोहचलं तिथं वर उडताना तिला दिसतय....
**जणू अशी पाखरे येती, ओंजळीत ल्या फुलांचा सुगंध हातावरी म्हणण्या पेक्षा डोळ्यात आनंद ठेवून जाती.**

# पीएम श्री शाळा सामान्य शाळांपेक्षा कशा वेगळ्या असतील ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५ सप्टेंबर २०२२ रोजी शिक्षक दिनानिमित्त पीएम श्री शाळांची घोषणा केली.राज्यातील ८४६ शाळांचा सर्वांगीण विकास करणाऱ्या पीएम श्री योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. देशभरात पहिल्या टप्प्यात १५ हजाराहून अधिक शाळा उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वोत्कृष्ट शाळा म्हणून विकसित करण्यात येणार असून यात राज्यातील ८४६ शाळांचा समावेश करण्यात येणार आहे. पीएम श्री योजनेत सहभागी होण्यासाठी राज्य शासनाने केंद्रासमवेत सामंजस्य करार केला आहे. या करारानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० राज्यात लागू करण्यात येईल. पीएम श्री योजनेत केंद्राचा ६० टक्के हिस्सा असेल. प्रत्येक शाळेसाठी १ कोटी ८८ लाख एवढी तरतूद ५ वर्षांसाठी करण्यात येईल.**

या शाळांसाठी ५ वर्षांकरिता केंद्राचा हिस्सा ९५५ कोटी ९८ लाख राहणार असून राज्याचा ४० टक्के हिस्सा प्रती शाळा ७५ लाख प्रमाणे ६३४ कोटी ५० लाख खर्च अपेक्षित आहे. या योजनेतील दुसऱ्या टप्प्यात ४०८ गट, २८ महानगरपालिका आणि ३८३ नगरपालिका व नगरपरिषदा यामधून पीएम श्री शाळांची निवड केली जाणार आहे.

या शाळांमधून अनुभवात्मक पद्धतीने आनंददायी शिक्षण देण्यात येईल. विद्यार्थ्यांची वैचारिक समज आणि वास्तविक जीवनातील त्याचा ज्ञानाचा वापर आणि योग्यतेवर आधारित मुल्यांकन करण्यात येईल. या शाळांमध्ये माजी विद्यार्थ्यांना देखील सहभागी करून घेऊन विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन व शैक्षणिक मदत करण्यात येईल. काही कारणांमुळे विद्यार्थ्यांची शाळेतून गळती झाल्यास त्यांना पुन्हा प्रवेश देऊन अशा मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यात येईल.

या शाळांचा विकास प्रामुख्याने पुढील ६ प्रमुख आधार स्तंभांवर केला जाईल. अभ्यासक्रम, आध्यापन शास्त्र व मुल्यमापन; प्रवेश आणि पायाभूत सुविधा; मानव संसाधन आणि शालेय नेतृत्व; समावेशक पद्धती आणि लैंगिक समाधान; व्यवस्थापन, देखरेख आणि प्रशासन; लाभार्थी समाधान. या योजनेची अंमलबजावणी राज्य स्तरावरून शालेय शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समिती, जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती आणि महापालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समित्यांमार्फत केली जाईल. राज्य प्रकल्प संचालक हे राज्य अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष असणार आहेत.

प्रधानमंत्री स्कूल फॉर रायझिंग इंडिया म्हणजेच पी एम श्री योजनेअंतर्गत विकसित केल्या जातील. हे काम टप्प्याटप्प्याने केले जाईल, असे पीएम मोदींनी सांगितले. पहिल्या टप्प्यात १४,५०० शाळा पी एम श्री शाळा म्हणून विकसित आणि श्रेणीसुधारित केल्या जातील. या शाळांमध्ये इतर शाळांपेक्षा वेगळे काय असेल, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सरकार सध्याच्या शाळांचा विकास आणि श्रेणीसुधारित करणार आहे आणि त्यांना पंतप्रधान श्री. २७,३६० कोटी रुपये खर्चून देशभरातील एकूण १४,५९७ शाळा विकसित केल्या जाणार आहेत. या वर्षापासून पायलट प्रोजेक्ट सुरू होणार आहे. या शाळांमध्ये काय होणार ? या शाळा कशा असतील ? याचा फायदा काय होणार ? या लेखात पीएम श्री योजनेंतर्गत बनवल्या जाणाऱ्या पीएम श्री शाळांची १२ प्रमुख वैशिष्ट्ये सांगितली जात आहेत. पीएम श्री शाळेची १२ वैशिष्ट्ये पीएम श्री ची घोषणा करताना, पीएम नरेंद्र मोदी म्हणाले की ही आदर्श विद्यालये म्हणजेच मॉडेल स्कूल असतील जी पूर्णपणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी (NEP) सुसंगत असतील. त्यांना केंद्राकडून निधी मिळेल. मोदींनी ट्विट केले की, पीएम श्री शाळांचे पूर्णपणे आधुनिकीकरण केले जाईल. शाळांच्या इमारतींचीही सुधारणा करण्यात येणार आहे. आधुनिक पायाभूत सुविधांनुसार त्यांची रचना केली जाईल.




या शाळांमध्ये स्मार्ट क्लासरूम तर असतीलच, शिवाय संगणक प्रयोगशाळेपासून प्रयोगशाळा, ग्रंथालय आदी ठिकाणी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. यामध्ये एनईपी अंतर्गत प्ले स्कूल देखील असतील. त्याचबरोबर या पी एम श्री शाळांमध्ये तिसरी ते बारावीपर्यंतचे वर्ग शिकवले जाणार आहेत. २० लाख विद्यार्थी शिक्षण घेतील. या शाळांसाठी एकूण ६० मानके निश्चित करण्यात आली आहेत. पी एम श्री देशातील प्रत्येक जिल्ह्याच्या ब्लॉकमध्ये शाळा उघडल्या जातील. या शाळा विद्या परीक्षा केंद्राशी जोडल्या जाणार आहेत. हे केंद्र शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा आढावा घेणार आहे. या शाळांमध्ये अधिकाधिक प्रायोगिक, परिवर्तनात्मक आणि सर्वांगीण म्हणजेच सर्वांगीण विकास/एकात्मिक पद्धती ( ज्यात सर्व प्रकारचे इनडोअर आणि आउटडोअर ॲक्टिव्हिटी असतील ) शिकवण्यासाठी आणि शिकण्यासाठी अवलंबल्या जातील. या शाळांमध्ये डिस्कव्हरी ओरिएंटेड आणि लर्निंग सेंट्रिक टीचिंग मेथड राबविण्यात येणार आहे. म्हणजेच, नवीन गोष्टी शिकण्याची आणि शोधण्याची क्षमता मुलांमध्ये विकसित होईल अशा पद्धतीने ते शिकवले जाईल. रटे शिकणे नाही. खेळ आणि खेळण्यांवर आधारित अध्यापनात शिकले जाईल. केवळ शिक्षणच नाही तर क्रीडा सुविधांमध्येही या शाळा अव्वल ठरणार आहेत. प्रत्येक लोकप्रिय खेळ, खेळ शिकण्याची, खेळण्याची संधी मिळेल. पीएम श्री शाळांमध्ये कला कक्ष देखील असतील. म्हणजे लहानपणापासूनच मुलांच्या व्यक्तिमत्त्वातही सर्जनशीलता आणि कला विकसित होऊ शकते. या शाळा ग्रीन स्कूल म्हणून विकसित केल्या जातील. त्यांचे कॅम्पस अशा पद्धतीने तयार केले जातील, जेथे जलसंधारणापासून ते कचऱ्याच्या पुनर्वापरापर्यंत, विजेची बचत होईल.

पीएम श्री शाळांचा अभ्यासक्रम असा असेल की तो मुलांमध्ये सेंद्रिय जीवनशैलीला चालना देऊ शकेल. शिक्षण मंत्रालयाच्या अधिकृत निवेदनानुसार, प्रत्येक वर्गातील प्रत्येक मुलावर लक्ष केंद्रित केले जाईल. प्रत्येक मूल किती शिकत आहे ? यासाठी प्रत्येक स्तरावर मूल्यमापन केले जाईल, ज्याद्वारे आपण शिकत असलेल्या गोष्टींचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग कसा करायचा हे मुलांना कळते की नाही याची चाचपणी केली जाईल.

# शिव हर शंकर, नमामी शंभर...!



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**यावेळी महाशिवरात्र 18 फेब्रुवारी रोजी रात्री 8 वाजून 3 मिनिटांनी सुरू होत आहे. तर माघ वद्य चतुर्दशी समाप्ती 19 फेब्रुवारी सायंकाळी 4 वाजून 19 मिनिटांनी होत आहे. त्यामुळे यंदा शिवरात्री अठरा फेब्रुवारी रोजी आहे. या दिवशी रात्री 10:58 तेक्ष1:36 हा काळ उपासनेसाठी अतिशय महत्त्वाचा आहे असे म्हटले आहे. आता महाशिवरात्री विषयी सविस्तर माहिती बघू... महाशिवरात्र" हिंदु बांधवांचा एक पवित्र सण जो अतिशय भक्तिभावाने सर्वत्र साजरा करण्यात येतो.**

महाशिवरात्री हा उत्सव माघ कृष्ण चतुर्दशी या दिवशी संप न्न होतो. इंग्रजी महिन्यानुसार हा उत्सव साधारणता फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात येते.

सर्व देवांमधे भगवान शिवाचे महत्व अधिक असुन हा दिवस अत्यंत पवित्र वातावरणात साजरा केला जातो. या दिवसाचे महत्व सांगत पुराणात अनेक कथा सांगितल्या आहेत.

ज्यावेळी समुद्र मंथन झाले त्यात सृष्टीशी निगडीत सर्व गोष्टींची निर्मीती झाली परंतु त्याचवेळी समुद्रमंथनातुन हलाहल विष देखील बाहेर आले.या विषात ब्रम्हांडाला नष्ट करण्याची ताकद होती. आणि या विषाला नष्ट करण्याची क्षमता केवळ भगवान शिवांमधेच होती त्यामुळे त्यांनी हे हलाहल विष प्राशन करून ब्रम्हांडाला वाचवले.

पण विष प्राशन केल्यामुळे त्याचा कंठ निळा झाला व संपुर्ण देहाचा दाह होत होता. वैद्यांनी भगवान शिवांना संपुर्ण रात्र जागुन काढण्याचा उपाय सांगितला.म्हणून भगवान शंकराला निलकंठेश्वर असेही म्हणतात. सर्व देवांनी भगवान शिवांना बरे वाटावे म्हणुन रात्रभर गायन आणि नृत्याची व्यवस्था केली. सकाळी महादेवांनी सर्वांना आशिर्वाद दिला. या संपुर्ण घटनाक्रमामुळे सृष्टी वाचली म्हणुन या दिवसाला महाशिवरात्री असे म्हंटले जाते.

अंगाच्या होत असलेल्या दाहामुळे भगवान शिवांनी या दिवशी तांडव नृत्य देखील केले होते.

महाशिवरात्री या दिवशी भाविक संपुर्ण दिवस उपवास करतात. भगवान शिवांचे शिवलिलामृत, महारूद्र, भजन, गायन इत्यांदिचे आयोजन केले जाते. भगवान शिवाचे दर्शन घेउन त्यांचा कृपाप्रसाद मिळवण्याकरीता आराधना केली जाते.

शिवाच्या मंदिरांमधे महाशिवरात्रीला मोठया संख्येने भाविकांची गर्दी दिसुन येते.

बारा ज्योर्तिलिंग ज्या ज्या ठिकाणी आहे तेथे तर लाखोंच्या संख्येने भाविक महाशिवरात्रीला दर्शन घेण्याकरता जमा होतात.देशभरात बारा जोतिर्लिंगे आहेत.पैकी पाच महाराष्ट्रात आहेत.

भगवान शिवाचे/महादेवाचे ज्या ज्या ठिकाणी मंदिर आहेत तेथे मोठया यात्रा भरतात. आपल्या महाराष्ट्रात त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, औंढानागनाथ, घृष्णेश्वर,भिमाशंकर, ही जोतिर्लिंगे व शिखर शिंगणापूर, ही प्रमुख स्थाने असून मोठी मंदिर आहेत. शिवशंकराला १०८ बेलपत्रे वाहुन शिवनामावली देखील म्हणतात.. महाशिवरात्रीला धोत्र्याचे फुल भगवान शंकराला वाहातात. महाशिवरात्रीला पाण्यात काळे तीळ टाकून भगवान शिवाचा अभिषेक केल्यास शनीच्या महादशापासून आराम मिळेल असे म्हटले आहे. महाशिवरात्रीला संध्याकाळी 5:42 ते 19 फेब्रुवारी सूर्योदयापर्यंत सर्वात सिद्धी योग आहे असे म्हटले आहे. या काळात दुरत केल्यास कार्यात यश मिळते तसेच धनप्राप्ती होते तसेच त्याचे चांगले परिणाम मिळतात.

शिवकृपा प्राप्त होण्यासाठी 'ओम नमः शिवाय' हा जप जास्तीत जास्त करतात.तसेच रुद्राभिषेकाचेही महत्व आहे. भगवान शिवाला 'भोळा शंकर' देखील म्हंणतात. उपासना केल्यावर त्वरीत प्रसन्न होणारा आणि ईच्छित फळ देणारा हा महादेव सर्वांचे कल्याण करणारा असा आहे. शिवपुराणात एक कथा सांगितली जाते ती अशी-- एक पारधी जंगलात शिकारी करता झाडावर बसला होता. संपुर्ण दिवस गेला परंतु त्याला शिकार मिळाली नाही. सायंकाळी हरणांचा एक कळप तेथे पाणी पिण्याकरता आला पारधी बाण सोडणार तेवढयात त्यातील एक हरीण पुढे येउन पारध्याला म्हणाला 'हे पारध्या तू आमची शिकार करणार हे माहित आहे परंतु मी तुला एक विनंती करतो, मला माझ्या कुटुंबाला एकदा भेटुन येऊ दे, माझी कर्तव्ये मला पार पाडुन येउ दे', हरणाने वचन दिल्याने पारध्याने त्यांची विनंती मान्य केली.



दुरवरून मंदिरातील घंटांचे आवाज येत होते ओम नमः शिवाय कानावर येत होते. पारधी ज्या झाडावर बसला होता ते झाड बेलाचे होते.

सहज चाळा म्हणुन एक एक पान तो खाली टाकत होता त्या झाडाखाली असलेल्या शिवपिंडीवर ती बेलाची पानं पडत होती. नकळत का होईना त्या पारध्याच्या हातुन शिवाची उपासना घडली.

हरीण परत आल्यानंतर त्याने पारध्याला म्हंटले 'की आता मला मार मी माझे कुटूंब प्रमुख असल्याचे कर्तव्य बजावुन आलो आहे तेंव्हा लगेच हरणी पुढे आली आणि तीने म्हंटले 'त्यांना नको मला मार मला माझे पत्नीधर्माचे कर्तव्य पार पाडायचे आहे'

त्वरीत हरणाची लहान पिल्लं पुढे आली आणि म्हणाली 'आईला नको आम्हाला मार आम्हाला आमचे पुत्रधर्माचे कर्तव्य पार पाडूदे'

ते पाहाता पारध्याच्या मनात विचार आला हे प्राणीमात्र असुन देखील आपापल्या कर्तव्याला चुकत नाहीत तर मी माझा मानवधर्म, दयाधर्म का सोडु? त्याने सर्वांना सोडून दिले.

देवाधिदेव महादेव हे सर्व पाहुन हरणावर आणि पारध्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनी त्या सर्वांना कृपाआशिर्वाद दिला.

सर्वांचा उध्दार केला हरिणाला मृग नक्षत्र म्हणुन व पारध्याला व्याघ्र नक्षत्र म्हणुन आकाशात नेहमीकरता स्थान दिले. हा प्रसंग ज्या दिवशी घडला तो दिवस होता महाशिवरात्रीचा ....अशी कथा आहे.

महाशिवरात्रीला शिवलिंगाची विशेष पूजा करतात.गाईचे दुध,तूप,शेण,गोमूत्र, दही,अशा पंचगव्याने पूजा करतात. शिवलिंगाला अभिषेक करतात. धोत्रा,बेलाची पाने, पांढरी फुले वाहतात. पांढरे चंदन लावतात.दोन्ही सांज उपवास करतात. ओम नमःशिवाय जप ,महामृत्युंजय जप...

ओम त्र्यंबकम यजामहे सुगंधिम पुष्टिवर्धनम उर्वारुकमीव बंधनान मृत्यो्रमुक्षिय मामृतात....

हा सुर्योदया पासूनते सूर्यास्ता पर्यंत करतात.

चारही प्रहरात शिवाचे विशेष पूजन केले जाते.

हा दिवस योग परंपरेत महत्वाचा मानला जातो. मोठी संधी त्यांना असते महाशिवरात्रीला. तसेच महाशिवरात्रीच्या दिवशी फक्त 11, 21, 51, बेलाची पाने आणून त्रिवेणी त्याचे कमळाच्या आकाराचे फुल तयार करायचे, त्यात तांदूळ पिवळे करून टाकायचे, तसेच काळे तीळ टाकायचे, आणि ते महादेवाच्या मंदिरात पिंडीवर नेऊन उलटे टाकायचे आणि आपली अडचण सांगून प्रार्थना करायची. असे केल्यामुळे आपल्याला यश मिळते असे शिवपुराण कथा सांगताना पंडित मिश्राजी यांनी सांगितले आहे. हा उपाय फक्त महाशिवरात्रीलाच करायचा आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी रात्री जरी हा उपाय केला प्रार्थना केली तरी चालतो.. हा दिवस शिव-पार्वतीचे लग्नाचा वाढदिवस म्हणून ही साजरा करतात. तर शत्रुवर विजय मिळवला म्हणून साजरा करतात.

आपणही सर्वजण "ॐ नमःशिवाय" जप करुन शिवाचा कृपाशीर्वाद मिळवू या.

**|| शिव हर शंकर, नमामी शंकर,शिवशंकर शंभो |||| हे गिरिजापती, भवानी शंकर, शिव शंकर शंभो.||**

# महाशिवरात्री 'ॐ नमः शिवाय'



हेमंत मुसरीफ
संपर्क ९७३०३९६९९६

आधुनिक केसरी

**कैलासराणा शिवचंद्रमौळी । फणींद्र माथां मुकुटी झळाळी । कारुण्यसिंधू भवदुःखहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ 'ॐ नमः शिवाय' या मंत्रामध्ये सर्व प्रकारचे दु:ख नष्ट करण्याची शक्ती आहे. 'शिव' म्हणजे पापाचा नाश करणारे, त्या आधी असणारा 'नमः' हा शब्द मोक्ष प्रदान करणारा आहे. उमा-महेश्वर हा देवादी देव महादेव आहे. 'नमः शिवाय' या पाच अक्षरी मंत्रात अद्भुत सामर्थ्य असून तो जगाचे कल्याणासाठी सार्थ ठरला आहे. शिवशंकराला देवांचा देव महादेव असे म्हणतात. महादेवाचे मंदिर नाही, असे गाव भारतात शोधून देखील सापडणार नाही. देशभरातील प्रत्येक प्रांतात शिवशकंराची आराधना केली जाते. 'हर हर महादेव...', अशा जयघोषात शिवाचे भाविक तल्लीन होऊन जातात.**

शिव नामस्मरण करून भाविक चराचरात सामावलेल्या शिवशंकराचा धावा करीत असतात. शिव हे दैवत मंगलमय, कल्याण करणारे असून त्यांच्यावर भाविकांची अपार श्रध्दा आहे. शिवकृपेने जीवनात कोणत्याच प्रकारचे दुःख येत नाही, अशी श्रद्धा आहे.शिव भोळा सांभ आहे. तो फार लवकर पावतो अशीही श्रद्धा असते. अशा आपल्या लाडक्या शिवाचे व्रत –शिवरात्र व्रत.
माघ कृष्ण चतुर्दशी ही तिथी महाशिवरात्र म्हणून पाळली जाते. या दिवशी उपवासाचे व्रत करतात. भगवान शिवाची आराधना आणि प्रार्थना करून दुसर्या् दिवशी व्रताची सांगता केली जाते.
शिवलीलामृत मध्ये एक कथा आहे.... दिवस महाशिवरात्रीचा. एक पारधी शिकारीसाठी जंगलात जातो. एका जलाशया जवळ झाडावर बसतो. पण दिवसभर वाट पाहून ही त्याला शिकार मिळत नाही. कंटाळतो. तेवढयात त्या जलाशयाजवळ हरिणाचा एक कळप पाणी पिण्यासाठी येतो.. पारधी खुश होऊन धनुष्याची दोरी खेचतो. तेवढ्यात त्या कळपातील मुख्य हरीण समोर येते विनवणी करू लागते. हे राजन शिकार करणे हा तुझा धर्म आहे. तसेच माझीही काही जबाब दारी आहे. मी माझ्या जबाब दारी पूर्ण करून सकाळी येतो . मला मार. पारध्याला दया येते तो परवानगी देतो. रात्री पारधी झाडावरच थांबतो. दूरवर एका शिव मंदिरात भजन कीर्तन चालू असते. ते त्याच्या कानावर पडते. 'ॐ नमः शिवाय जप चालू असतो . तो ही नकळत जप करू लागतो. सहज झाडाची पाने खाली टाकू लागतो . ती पाने नेमकी बेलाची असतात. खाली महादेवाची पिंड असते त्यावर बेलपत्र पडतात. त्याला उपवास घडतो तो ही नकळत.
सकाळी हरिणाचा कळप पुन्हा हजर. मुख्य हरीण म्हणते मला मार. तेवढ्यात त्या हरिणाची पत्नी म्हणते मला मार . मला पत्नी व्रत करू दे. मुले मानतात नाही आम्हांला मार. त्यांच्यात चढाओढ चालू होते.. पारध्याला दया येते . तो सर्वांना सोडतो. नकळत शिवव्रत व पूजा झाली म्हणून शिवशंकर प्रसन्ना होतात. सर्वांचा उधार करतात.
हरिणांना मृग नक्षत्र म्हणून व पारध्याला व्याघ्रनक्षत्र हे आढळ स्थान आकाशात मिळते.
`महाशिवरात्री' म्हणजे काय ? : पृथ्वीवरील एक वर्ष म्हणजे स्वर्गलोकातील एक दिवस. शिव रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतो. शिवाच्या विश्रांती घेण्याच्या काळाला `महाशिवरात्री' असे म्हणतात. शिवाच्या विश्रांतीच्या काळात शिवतत्त्वाचे कार्य थांबते, म्हणजेच त्या काळात शिव ध्यानावस्थेतून समाधि-अवस्थेत जातो. शिवाची समाधि-अवस्था म्हणजे शिवाने स्वतःसाठी साधना करण्याचा काळ. त्या काळात विश्वातील तमोगुण शिवतत्त्व स्वीकारत नाही. त्यामुळे विश्वामध्ये तमोगुणाचे प्रमाण किंवा वाईट शक्तींचा दाब प्रचंड वाढतो.
त्याचा परिणाम आपल्यावर होऊ नये म्हणून शिवतत्त्व आकृष्ट करून घेण्यासाठी महाशिवरात्रीचे व्रत करावे.
अशा पद्धतीने पुराण कथेसहित शत्रोक्त आधारही आहे. शिवरात्रीच्या दिवशी एकभुक्त रहावे म्हणजे एकदाच काही उपवासाचे खावे. काही लोक अनेक पदार्थ करूनखात राहतात.असो. शिवरात्रीला रात्रीच्या चार प्रहरी चार पूजा कराव्या, असे विधान आहे. त्यांना `यामपूजा' असे म्हणतात. प्रत्येक यामपूजेत देवाला अभ्यंगस्नान घालून अनुलेपन करावे. पंचगव्य म्हणजे गायीचे दूध, तूप, शेण, गोमूत्र आणि दही लावून शिवलिंगाला अभिषेक केला जातो. त्यानंतर दूध, दही, तूप, मध आणि साखर या पंचामृताने शिवलिंगाला लेपन केले जाते. त्यानंतर धोत्रा आणि बेलाची पाने तसेच पांढरी फुले वाहून पूजा केली जाते.

**मंदार बिल्वें बकुलें सुवासी । माला पवित्र वहा शंकरासी ।**
**काशीपुरी भैरव विश्व तारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥**

.. तांदुळाच्या पिठाचे २६ दिवे करून त्यांनी शिवाला ओवाळावे. पूजेच्या शेवटी १०८ दिवे दान द्यावेत. प्रत्येक पूजेचे मंत्र वेगवेगळे असतात, त्यांनी अर्घ्य द्यावे. शिवस्मरणात जागरण करावे. पहाटे स्नान करून पुन्हा पूजा करावी. पारण्याला ब्राह्मणभोजन घालावे.

**शिवाला बेलपत्र प्रियः**



एकदा विष्णुची पत्नी लक्ष्मीने श्रावण मासात शिवलिंगावर प्रतिदिन 1001 पांढरे कमळाची फुले वाहण्याचे व्रत करण्यामचे ठरविले. लक्ष्मीने परडीत मोजून कमळे ठेवली. मात्र मंदिरात पोहचल्यानंतर तीन कमळाची फुले कमी भरली. त्याचे लक्ष्मीला आश्चर्य वाटले. त्यानंतर तिने फुलांवर पाणी शिंपडले आणि चमत्कार झाला. फुलांमधून एक रोपटे बाहेर आहे. त्याला त्रिदलासारखी पाने त्याला होती. ते बेलाचे रोपटे होते. त्यावरील बेलपत्र लक्ष्मीने तोडून शिवलिंगवर वाहिली. लक्ष्मीच्या भक्तिमधील सामर्थ्य पाहून भोलेनाथ प्रसन्न झाले व तेव्हापासून शिवशंकराला बेलपत्र प्रिय आहे. भक्तावर तत्काळ प्रसन्न होणारा शिवशंकर खरोखरच महादेव आहे.

**शिवाचे ध्यान**

**ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरिनिभं चारूचंद्रावतंसं रत्नाकल्पोज्ज्वलांग परशुमृगवराभीतिहस्तं प्रसन्नम् ।**
**पद्मासीनं समन्तात् स्तुतममरगणैर्व्याघ्रकृत्तिं वसानं**
**विश्वाद्यं विश्वबीजं निखिलभय हरं पंचवक्त्रं त्रिनेत्रम् ।**
**ॐ नमः शिवाय,ध्यानार्थे अक्षतपुष्पाणि समर्पयामि ।**
**ॐ नमः शिवाय, पाद्यं, अर्घ्यं, आचमन्यं स्नानं समर्पयामि।**

जे जमेल ते करावे . बस जे कराल ते श्रद्धेने करावे ही विनंती,
श्री गुरुचरित्र ४४ व्या अध्यायात एक कथा आहे. किरातदेशीं ' विमर्षण ' राजा व कुमुद्वती राणी यांच्या पूर्वजन्माची कथा. विमर्षण ' राजा पूर्वजन्मी कुत्रा असतो.. एक दिवस त्याला खायला मिळत नाही उपवास घडतो. तो अन्नाच्या शोधात शिव मंदिरी जातो. त्याला सारे हाकलत राहतात. तो पुढे पळत राहतो त्या निमिताने मंदिराला तीन प्रदक्षिणा करतो. शिव पूजा पाहतो. तो त्या रात्री मरतो पण शिवरात्र व्रत नकळत होतो. तेवड्याने त्याला नवा जन्म राजाचा मिळतो. त्याची पत्नी कुमुद्वती राणी पूर्वजन्मी कबुतर असते. तिच्या तोंडातला घास पाहून त्याच्या मागे घार लागते. कबुतर घाबरून जोरात उडू लागते. नकळत शिवमंदिराला प्रदक्षणा करते. घार तिला मारते. शिव पूजा पाहून ती उपवास करून मारते. तिला पुढील जन्म राणीचा मिळतो.
नकळत घडलेल्या पुण्यामुळे इतके काही मिळते. तर नीट श्रद्धेने शिवरात्र केली तर कसे होईल.

**शास्त्राभ्यास नको श्रुति पढुं नको तीर्थासि जाऊं नको ।**
**योगाभ्यास नको व्रतें मख नको तीव्रें तपें तीं नको ।**
**काळाचे भय मानसीं धरुं नको दुष्टांस शंकूं नको ।**
**ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको ॥**
**॥ इति श्रीशिवस्तुति ॥**
**ओम नम : शिवाय ..**

# श्री समर्थ रामदास स्वामी



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**सद्गुरु श्री समर्थ रामदास स्वामींचा जन्म सन १६०८ चैत्र शुद्ध नवमीला भर मध्यान्हीला म्हणजेच प्रभू रामचंद्र ज्या मुहूर्ता जन्मले त्याच मुहूर्तावर झाला. त्यांचे नाव नारायण ठेवण्यात आले. त्यांच्या आईचे नाव राणूबाई तर वडीलांचे नाव सूर्याजीपंत ठोसर असे होते. लहानपणापासूनच स्वभावाने अत्यंत हूड वाटत असलेला नारायण निरोगी, चपळ व बळकट होता. सात वर्षाचा असतानाच कुशाग्र बुद्धीच्या नारायणास पूजा, रुद्र सगळं तोंड पाठ होते. नारायण सहा सात वर्षाचा असताना त्याचे वडील वारले.**

नारायण जसा मोठा होत गेला तसा तसा अंतर्मुख होत गेला. त्या तासनतास मारुतीच्या देवळात बसून ध्यान करणाऱ्या नारायणाच्या ध्यानावस्थेत एकदा श्रीरामाची मूर्ती डोळ्यापुढे उभी राहिली ते रूप पाहण्यात नारायण दंग झाला त्याचे शरीर व मन दोन्ही रामरुप झाले. तेव्हापासून नारायण सगळा वेळ ध्यान धारणेत व व्यायामात घालू लागला. त्यांचे शरीर बळकट व स्नायू पिळदार झाले. सहजच जोंधळ्याचे पोतं उचलणाऱ्या नारायणाला लोक मारुतीचा अवतार समजू लागले.

त्यावेळी मुसलमानांचे राज्य होते, पोटापाण्यासाठी लोक मुसलमानी राजांकडे जात होते काही लोक भाकरीचे मिंधे होऊन मुसलमान धर्म स्वीकारित. नारायणाला हे बघवत नसे. लोकांचा स्वाभिमान जागृत करावा, स्वधर्म जागवून लोकांच्या मनाचे सामर्थ्य वाढवावे असे विचार नारायणाच्या मनात वारंवार येत असत.

अकरा वर्षाचा झाल्यावर नारायणाच्या आईला त्याच्या लग्नाचे वेध लागले परंतू लग्नाचा विषय निघाला की नारायण टाळाटाळ करत असे. आईचे जीव राहिना तिने नारायणाकडून वचन घेतले की निदान लग्नाचा अंतर पार धरलेला तरी मला पाहू दे. आईची ही तळमळ पाहून नारायणने कसेबसे हो म्हटले. लग्न ठरल्यावर नारायण बोहल्यावर उभा राहिला. अंतरपाट धरल्यावर भटजी खड्या सुरात म्हणाले "शुभ मंगल सावधान" नारायणाने विचार केला आईच्या वक्त वचनातून आपण आता मुक्त झालो आहे. त्याने क्षणार्धात तिथून धूम ठोकली व कुणाला सापडला नाही. गावाच्या विरुद्ध दिशेने जात नारायण एका गावाच्या सीमेवर देवळाच्या ओसरीत झोपला. रात्री मंदिरातील भगत आला असता त्याने चौकशी केली असता त्यांनी सांगितले "मी रामदास रामाकडून आलो आणि रामाकडे निघालो." तेव्हापासून लोक नारायणाला रामदास या नावाने ओळखू लागले. रामदासांना एकच ध्यास लागला होता तो म्हणजे पंचवटीला जायचा आणि घोर तपस्या करायचा. मजल दरमजल करत ते नाशिकला आले. तिथे त्यांनी तीर्थ स्थानावरील अनागोंदी कारभार पाहिला. ढोंगी लोक भोळ्या जनतेला देवाच्या नावाने फसवत होते. देवाचा कोंदट गाभारा, चांदीच्या बटबटीत डोळ्यांची श्रीरामाची मूर्ती बघून त्यांना गलबलून आले. ते देवळाबाहेर आले व रामरायाची आळवणी करू लागले. त्यातच ते झोपी गेले. त्यांच्या कानात अचानक आवाज आला,"नारायणा कष्टी होऊ नकोस मी सदैव तुझ्या हृदयातच आहे. तू साधना कर. इथून जवळच नंदिनी नदीच्या काठी जाऊन तप कर" मार्ग मिळतात रामदास नंदिनीच्या काठी निघाले. निर्धाराने साधना केली राम नामाचा अखंड जप केला. तपश्चर्येमुळे तेजस्वी दिसणाऱ्या व स्वतःला रामाचा दास म्हणवणाऱ्या या बालयोग्याला लोक रामदास म्हणू लागले. निरनिराळ्या ग्रंथांचा त्यांनी सपाटून अभ्यास केला. सकाळ संध्याकाळ ते सूर्यनमस्कार घालू लागले. रामनाम घेऊ लागले.

**भीमरूपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती | वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना || महाबळी प्राणदाता, सकळां उठवी बळें | सौख्यकारी दुःखहारी, दुत वैष्णव गायका ||**

सांगत मुलांना त्यांनी शक्तीची उपासना करायची गोडी लावली. बघता बघता त्यांच्यावर लोकांची श्रद्धा बसू लागली कोणी गावकरी अडीअडचणी उपाय विचारत असतात रामदास त्यांना चार समजूतीचे शब्द सांगत आणि म्हणत

**'जगी सर्व सुखी असा कोण आहे ? विचारी मना तू ची शोधून पाहे'**

संपूर्ण सारासार विचार केल्यास वरपांगी सुखी दिसणारे सर्वच जीव मुळात कुठल्याश्या सुखाच्या शोधात आहेत आणि त्या सुखाच्या अभावामुळे त्यांना संपूर्ण पणे सुखी असे म्हणता येणे शक्य नसल्यानवं तू स्वतः ठरविलेस तरच तू समाधानी सुखी होणार आहेस, अन्यथा नाही. रामनवमीला २४ वर्षांचे झाल्यावर रामदास कठोर तपस्या करून सर्वार्थाने समर्थ झाले. त्यांनी त्यांच्या शिष्य उद्धवाला आपण तीर्थयात्रेला जाणार असून बारा वर्षांनी परत येणार तोवर त्याची साधना सुरू ठेवण्याचे सांगितले.

आपल्या देशातील अनेक पवित्र तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेऊन वेगवेगळ्या प्रदेशातून हिंडून संप्रदायांची प्रेरणा देण्यासाठी रामदास पायी चालत सगळीकडे हिंडले. जागोजागी शिष्य तयार केले. मठ स्थापन केले. नर्मदेला त्यांना चरणदास हा शिष्य मिळाला. तर उज्जैनला रघुनाथ नावाचा रामभक्त मिळाला. तिथे रामदासी मठ स्थापून बोलोपासण्याचे महत्त्व सांगून व धर्मजागरण करून ते इंदूरला आले. तिथल्या शिवरामाने रामदासी संप्रदायाची दीक्षा घेतली. कधी कोणी उपेक्षा, हेटाळणी केली. तरी ते कोणावरही न रागवता स्वतःला समजावीत

**नको रे मना क्रोध हा खेदकारी ।**
**नको रे मना काम नाना विकारी ।।**
**नको रे मना लोभ हा अंगीकारू ।**
**नको रे मना मत्सरू दंभभारु ।।**


रामदास सातपुड्याच्या पर्वतमय प्रदेशात गेले तिथे त्यांनी नदीच्या काठी एका कड्यावर मारुतीची स्थापना केली. मध्य भारताचा प्रवास करत ते अयोध्येला आले. या प्रवासात त्यांनी जुलमाचे राज्य, दारिद्र्याने गांजलेला समाज, लोकांची निष्क्रियवृत्ती बघितली. जुलूम आणि अन्याय सहन करणारे व दैवाला दोष देत राहणारे लोक त्यांना नेळभट झाले असल्याचे वाटे. लोकांना एकत्र केले पाहिजे. संघटना तयार केली पाहिजे असे रामदासांना जाणवू लागले. त्यांनी अयोध्येला मठ बांधला आपल्या रामकृष्ण नावाच्या शिष्याला उपदेश देऊन मठाची कामगिरी सोपवून ते मथुरेस गेले. मथुरेला मठ स्थापन करून ते हरिद्वारला आले. पुढे काशीला गेल्यावर काशीविश्वेश्वराचे उध्वस्त झालेले मंदिर त्यांना दिसले औरंगजेब बादशहाचा अन्याय पाहिल्यावर हे सर्व बदलण्यासाठी धर्म न्याय,नीती यांची चाळ असणारा आपला राजा असायला हवा असे त्यांना वाटत असे. काशीच्या घाटावर त्यांनी मारुतीची स्थापना केली तिथे रामचंद्र नावाचा त्यांचा एक शिष्य तयार झाला. अशा प्रकारे ठीकठिकाणी त्यांनी आपल्या विचारांचे लोक रामदासी संप्रदायाच्या मालिकेत गुंफले. जगन्नाथ पुरीला आल्यावर त्यांना पद्मनाभ नावाचा शिष्य मिळाला. तिथे सुद्धा मठाची स्थापना करून सारा दक्षिण भारत फिरून ते कोकणात आले. परशुरामांचा आशीर्वाद घेऊन कोल्हापूरला आल्यावर तिथे अंबाबाईला देशातील परिस्थितीचं साकडं त्यांनी घातलं व टाकळीला परत आले इथे उद्धव हा त्यांचा शिष्य त्यांची वाट पाहतच होता. रामदासांनी पंचवटीतल्या रामाची मनोभावे प्रार्थना करून यात्रेचे पुण्य श्रीरामाच्या चरणी वाहिले.

बालपणापासूनच वैराग्याकडे कल असणाऱ्या स्वामी समर्थांनी बोहल्यावर पळ काढून प्रपंचाकडे पाठ फिरवली , परंतु बारा वर्षाचा अनुष्ठान व नंतर बारा वर्षे भारतभर तिथे यात्रा केल्यानंतर भारतातील एकंदर धार्मिक राजकीय व सामाजिक परिस्थिती आकलन झाल्यावर त्यांच्या जीवित कार्यालयात विशिष्ट दिशा प्राप्त झाली व काळाची गरज ओळखून समर्थ रामदासांनी केवळ परमार्थाची शिकवण न देता लोक व्यवहार ज्ञानाचे धडे शिकविले. 'प्रपंच करावा नेटका' हे त्यांचे सर्वश्रुत वचनामृत होय.

**जे जे आपणासी ठावे ।ते दुसऱ्याशी शिकवावे।**
**शहाणे करोनि सोडावे ।सकल जन ।।**

हा संकल्प करून त्यांनी जगाच्या कल्याणाकरता स्वतःला वाहून घेतले.

**गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा।**



**मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा॥**
**नमूं शारदा मूळ चत्वार वाचा।**
**गमूं पंथ आनंत या राघवाचा॥**

समर्थ रामदासांच्या मनाच्या श्लोकांमधला हा पहिला श्लोक. निर्गुणाचं साकार रूप असणाऱ्या गणाधीशाला नमन करून समर्थांनी मनाच्या श्लोकांना प्रारंभ केला आहे. त्यांनी एकूण २०५ 'मनाचे श्लोक' रचले. सर्व श्लोकांमध्ये मनाचं सामर्थ्य वाढविण्याचे उपाय सांगितलेले आहेत. मनाचे श्लोक म्हणजे मनाशी साधलेला संवाद असून आपणच आपल्याला बजावायच्या आणि तसं वागायचा प्रयत्न करण्याच्या या गोष्टी जगाला मनाचे श्लोक देणारे रामदास स्वामी मला एक अद्वितीय मानसशास्त्रज्ञ वाटतात.

आधी नेटनेटका संसार करावा, आपला प्रपंच योग्य प्रकारे करून मग परमार्थाचा विचार करावा असा संदेश स्वामी समर्थांनी दिला. प्रयत्न, उद्योग, कष्ट करण्यावर रामदासांनी वारंवार भर दिला असून **आळस अवघाच दडवावा ।यत्न उदंडचि करावा ।।**

कष्टता सौख्य मानावे असे सांगत त्यांनी प्रयत्नवादाचा पुरस्कार केला कारण यत्नाच्या बळावरच लोक सुखी होऊ शकतील. सतत उद्योग करणारा शेवटी सुखी होतो असे सांगत बाह्यरंग, रूपाला पोषाखाला महत्त्व न देता अंतःकरणाच्या सौंदर्यावर व गुणांवर भर देण्याची शिकवण स्वामी रामदासांनी आपल्याला दिली. समाजात कसे राहावे, कसे बोलावे, कसे चालावे, कसे लिहावे, कसे वागावे, लोकांचे मने न दुखवता लोकसंग्रह कसा करावा, उत्तम पुरुष कोणाला म्हणावे, मूर्खाची लक्षणे कोणती, ती कशी टाळावी याबद्दल स्वामी रामदासांनी दासबोधात वेळोवेळी उपदेश केला असून तो प्रत्येक संसार व्यक्तीला मार्गदर्शक आहेत.

लोक जागृती करतच समर्थ रामदास लोकांचा स्वाभिमानही जागृत करत होते प्रजा बलवान व्हावी यासाठी आखाडे प्रस्थापित करत होते. याच काळात त्यांची जयराम स्वामी, रंगनाथ स्वामी, मोरया गोसावी इत्यादी संतांची भेट झाली. त्यांनी महाराष्ट्रधर्म वाढवण्याचेही कार्य केले.

**मराठा तितुका मेळवावा ।**
**महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।**
**जय जय रघुवीर समर्थ।**
**असे म्हणत माणसांच्या मनातल्या प्रेरणा जागृत ठेवल्या.**
**सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे ।।**
**परंतु तेथे भगवंतांचे ।अधिष्ठाण पाहिजे ।।**

समर्थांची निःस्वार्थी वृत्ती आणि काम करण्याची तळमळ पाहून ते जिथे जातील तिथे त्यांना शिष्य मिळत त्यांनी जवळपासच्या परिसरात एकरा ठिकाणी मारुतीची स्थापना केली. तरुणांची मने वळविली. त्यांच्यातील देशप्रेम जागृत केले.

स्वामी समर्थांना उद्धव, दिवाकर, कल्याण, दत्तात्रेय, भैरव, गणेश, निरंजन, वामन, चक्रपाणी, बाळकराम यांच्यासारखे अनेक निष्ठावान अनुयायी मिळाले. वेणाबाई, अक्का सीताबाई यांनाही त्यांनी आपल्या पंथात सामील करून घेतले.

आयुष्यभर केलेल्या चिंतनाचे सार आपल्या शिष्यांना द्यावे यासाठी त्यांनी सांगितलेला व कल्याणने लिहलेला

त्यांचा दासबोध हा ग्रंथआपणा सर्वांसाठी मार्गदर्शक आहे. रामदासांनी लिहिलेले मनाचे श्लोक आजही आपल्याला सार्थक आणि मार्गदर्शक वाटतात. त्यांचे भीमरूपी स्तोत्र अत्यंत प्रभावी असून स्फुर्तीदायक आहे. त्यांची करुणाष्टके ऐकून त्यांच्या रामभक्तीचा प्रत्यय येतो. समर्थ रामदासांच्या त्यांच्या अनेक आरत्या, श्लोक आजही लोक नित्य पाठात म्हणत असतात. त्यांचे भगवंतावर अचल प्रेम, श्रद्धा, अखंडम नामस्मरण आणि तरीही जनतेला यवनी पाशातून मुक्त करण्यासाठी केलेले अखंड प्रयत्न पाहून आश्चर्य वाटते. समर्थांसारखे निस्पृह संत भारतभूमीला लाभले हे आपले अहोभाग्यच होय.

**सदा सर्वदा योग तुझा घडावा।**
**तुझे कारणी देह माझा पडावा ।**
**उपेक्षू नको गुणवंता अनंता ।**
**रघुनायका मागणे हेचि आता ।।**

असे म्हणत समर्थांनी १६६१ मध्ये माघ वद्य नवमीला सज्जनगडावर रामाच्या मूर्ती समोर बसून तीन वेळा रामनामाचा गजर करून आपला अवतार समाप्त केला. रामाच्या मूर्तीपुढे आपला देह ठेवला. तेव्हापासून माघ वद्य नवमी हा दिवस दास नवमी या नावाने ओळखला जातो. श्रीरामाचे नाव, अनुसंधान अखंड जपणाऱ्या त्यामुळे अंतर्बाह्य पवित्र होऊन आत्मसाक्षात्कार झालेल्या ज्यांच्या वाङ्मयातून उत्कट रामभक्तीचा अखंड धडा खडखळ वाहत आहे अशा रामभक्त शत शत नमन.

# महाशिवरात्री : एक पवित्र सण

आधुनिक केसरी

आपल्या भारत देशामध्ये अनेक सण आणि उत्सव मोठ्या आनंदाने साजरे केले जातात. काही सणांना धार्मिक महत्त्व असते तर, काही सणांना सामाजिक महत्त्व प्राप्त झालेले असते. असाच एक हिंदु बांधवांचा पवित्र सण जो भक्तिभावाने सर्वत्र साजरा करण्यात येतो. भक्ती आणि उत्सवाचे स्वरूप प्राप्त झालेला सण म्हणजे महाशिवरात्री होय.

महाशिवरात्री हा उत्सव माघ कृष्ण चतुर्दशी या दिवशी साजरा केला जातो. इंग्रजी महिन्याचा विचार केला असता, महाशिवरात्री, हा उत्सव फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात येतो. महाशिवरात्रीची एक पौराणिक कथा वाचायला आणि ऐकायला मिळते . ती कथा अशी आहे की, ज्यावेळी समुद्र मंथन झाले . त्यावेळी त्या समुद्र मंथनामध्ये सृष्टीशी निगडीत सर्व महत्त्वपुर्ण गोष्टींची निर्मीती झाली परंतु , त्याचवेळी समुद्र मंथनातुन हलाहल विष देखील बाहेर आले.



भगवान राईतकर
(गोभणीकर)
मो. 9730332151

विष म्हणजे जीवन नष्ट करणारी गोष्ट. समुद्रमंथनातून बाहेर आलेल्या या विषात ब्रम्हांडाला नष्ट करण्याची ताकद होती. ब्रह्मडाला नष्ट करणाऱ्या या विषाला नष्ट करण्याची क्षमता केवळ भगवान शिव यांच्यामध्ये होती. ब्रह्मांडाला नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी भगवान शिवांनी समुद्र मंथनातील हे हलाहल विष प्राशन करून ब्रम्हांडाला वाचवले.

परंतु, समुद्र मंथनातील ते विष प्राशन केल्यामुळे भगवान शंकराचा कंठ निळा झाला . शरीरामध्ये गेलेल्या विषामुळे संपुर्ण शरीराचा दाह होत होता. यावर उपाय म्हणून वैद्यांनी भगवान शिवांना संपुर्ण रात्र जागुन काढण्याचा उपाय सांगितला.

ब्रह्मांडाला नष्ट होण्यापासून वाचविणाऱ्या भगवान शंकराला बरे वाटावे म्हणुन, रात्रभर गायन आणि नृत्याची व्यवस्था केली. शारीरिक किंवा मानसिक दाह कमी होण्यासाठी संगीत उपयुक्त ठरते. यानंतर, सकाळी भगवान महादेवांनी सर्वांना आशिर्वाद दिला. भगवान शंकरांनी हे हालहाल पचविले. या सर्व घटनेमुळे सृष्टी वाचली. त्यामुळे या दिवसाला महाशिवरात्री असे म्हणतात.

भगवान शंकराला शिव सुद्धा म्हणतात. संत साहित्यामध्ये शिव शब्दाचे चार तात्त्विक अर्थ सांगितले आहेत. पहिला अर्थ म्हणजे शिव या शब्दाचा अर्थ होतो कल्याण .जे कुणी भक्त शिव नामाचा जप करतात त्यांचे कल्याण होते ;असे मानले जाते. कल्याण याचा अर्थ असा न घेता कल्याण म्हणजे परमानंद सुखाची प्राप्ती आणि दुःखाची निवृत्तीअसा घेणे महत्त्वाचे आहे.

शिव या शब्दाचा दुसरा अर्थ म्हणजे शिवणे किंवा जोडणे होय. याचा अर्थ जीवाने जीवाशी नाते जोडण्यापेक्षा शिवाशी नाते जोडावे असा होतो. शिव या शब्दाचा तिसरा अर्थ होतो , स्पर्श करणे. म्हणजे जिवाचा शिवाशी स्पर्श झाला पाहिजे तरच जीव आत्मा होतो म्हणजे दोषमुक्त होतो. शिव शब्दाचा चौथा अर्थ असा होतो की, शिव म्हणजे मर्यादा. खऱ्या सुखाची प्राप्ती करायची असेल तर आपल्या जीवनातील प्रत्येक गोष्टीला मर्यादा असणे महत्वाचे आहे. हे तत्व शिव या शब्दात आपल्याला शिकावयास मिळते. शिवाच्या नावातून आणि शिवाच्या कार्यातून शिव ही देवता कल्याणकारी देवता आहे हे आपल्या लक्षात येते. भगवान शंकराचे सदैव नामस्मरण करत शिव या शब्दाचे चार तात्त्विक अर्थ जर आपण शिवभक्त म्हणून समजून घेतले आणि त्याप्रमाणे योग्य असे वर्तन केले तर, शिव भगवान सदैव आपले कल्याण करतील ! ओम नमः शिवाय !

**(लेखक संत साहित्याचे अभ्यासक व व्याख्याते आहेत)**



# ग्रा.पं.ला घ्यावा लागला केलेल्या कामाविरूद्धचा ठराव

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** जळगाव जामोद तालुक्यातील सुनगाव ग्रामपंचायतीवर अतीशय नामुशक्की वेळ आली आहे. खुद्द ग्रामपंचायतलाच घ्यावा लागला ग्रामंपचायतीने केलेल्या कामाविरूद्धचा ठराव.

याबाबात सविस्तर वृत्त असे की, १५ व्या वित्त आयोगातून 2022-23 साठी सुनगाव ग्रामपंचायतीला गावातील वारड क्रमांक चार मधील गोलक्षणाथ मंदिराकडे जाणाऱ्या नाल्यावर रहदारीच्या रस्यावर पुल बांधण्यासाठी पाच लाखाचा निधी मंजूर झाला. त्याबाबतचे अंदाजपत्रकही तयार होवून मंजूर झाले. परंतू पुलाच्या कामासाठी ई टेंडर न काढता सरपंच रामेश्वर अंबडकार व ग्रामसेवक यांनी बांधकाम अभियंता काळपांडे पंचायत समिती जळगाव जामोद यांच्या आशिर्वादाने पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे केले तसेच अंदाज जपत्रकाला धाब्यावर बसवत स्वताच्या मर्जीने पुलाचे बांधकाम केले. अंदाजपत्रकानुसार पुलाचे बांधकाम २४ फूट असतांना पुलाच्या आतून १३ व बाहेरून १६ फुट केले. तसेच तीन पाईप टाकयचे असतांना त्या






पाईपला ज्वाईड कपल न करता पुलामध्ये दोन आठ आठ फुटाचे सिमेंट पाईप टाकण्यात आले. एकतर सदर पूल हा महत्त्वाच्या ठिकाणी असल्याने पुलावरून रहदारी मोठ्या प्रमाणावर असते.परंतू आजरोजी या पुलावरून दोन वाहनेही व्यवस्थित जावू शकत नाही.

भविष्यात हा पूल किती दिवस टिकेल याचि शाश्वती नाही. तसेच नागरिकांनाही याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यामध्ये विशेष असे की,सरपंच व ग्रामसेवक यांनी पुलाचे काम अवघ्या चार ते पाच दिवसात मोठ्या घाईगडबडीत करून घेतले. यावेळी पंचायत समितीचे इंजिनिअरियर काळपांडे साहेब तीथेच हजर होते.त्यांच्या देखरेखेखालीच सदर पुलाचे काम करण्यात आले आहे.

सरपंच, ग्रामसेवक आणि इंजीनियर यांनी स्वताचा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी अंदाजपत्रकाला धाब्यावर बसवून मनमानी कारभर करत पुलाचे काम केले.एकीकडे गावाच्या विकासासाठी पंधराव्या वित्त आयोगातून मोठ्या प्रमाणावर निधी दिल्या जातो.परंतु असे भ्रष्ट लोकप्रतिनिधी आणि सरकारी कर्मचारी,अधिकारी आपल्या अधीकाराचा वापर करत गावाच्या विकासासाठी आलेल्या पैशावर स्वतःच उखळ पांढर करून घेतात.सुनगाव ग्रामपंचायत हे याच जीवंत उदाहरण आहे.अजूनही तालुक्यातील अशा बऱ्याच ग्रामपंचायती आहेत ज्यामध्ये गावाच्या विकासासाठी आलेल्या पैशावर नजर ठेवत सरपंच ग्रामसेवक, इंजीनियर साहेब स्वतःचा आर्थिक फायदा फायदा करून घेतांना दिसतात.लोक जागृत असले तर वेळीच अशा प्रकाराला आळा बसू शकतो.

सरपंच रामेश्वर अंबडकार आणि ग्रामसेवक आणि इंजीनियर कळपांडे यांच्याच संगनमताने सदर पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे केले असून पुलाच्या कामाची एम.बी. झालेल्या कामाचे देयके न काढण्याबात गजानन धुळे यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती जळगाव जामोद यांचेकडे तक्रार दाखल केली आहे.तसेच ८ फेब्रुवारी 2023 रोजी सुनगाव ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या मासिक मिटींगमध्ये ग्रामपंचायत सदस्य गजानन दातीर आणि कौसल्या ढगे यांनी सदर पुलाच्या निकृष्ट कामाबाबतचा मुद्दा उपस्थित करून सर्वांचे लक्ष वेधले.

पुलाचे काम हे अंदाजपत्रकानुसार झाले नसल्याने सदर पुलाच्या कामाचे देयके थांबवण्यात यावे व परत अंदाजपत्रकानुसार पुलाचे काम करण्यात यावे असे सांगितले . यावर सरपंच रामेश्वरम अंबडकार, ग्रामसेवक आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी यावर चर्च केली . व सदर पुलाच्या कामाचे देयके जोप्रयंत काम अंदाजपत्रकानूसार होणार नाही तोपर्यंत बील काढू नये असे सर्वानुमते ठरले व तसा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला .त्यामुळे सुनगाव ग्रामपंचायतीला केलेल्या कामाच्या ठरावाच्या विरुध्दचा ठराव घेण्याची नामुष्की खुद्द सुनगाव ग्रामपंचायतीवर आली आहे . सदर सुनगाव ग्रामपंचायतीच्या या मनमानी कारभाराची जिल्हाभर मात्र खमंग चर्च आहे .

# छत्रपती शिवाजी महाराज परत आले तर...?

आधुनिक केसरी

महापुरुषांनंतर त्यांच्या कार्य-कर्तृत्वाचा जयघोष केला जातो! त्या व्यक्ती आदर्श होतात. तसेच काही लोक भावनिक होऊन "परत या, परत या, राजे तुम्ही परत या!" अशा घोषणा देतात. परंतु भावनेने पोट भरत नसते. काही गोष्टी केवळ बोलण्यासाठीच असतात, त्यापैकी ही एक गोष्ट! अशी आव्हाने करून महापुरुष परत येत नसतात, आणि कल्पना करा, खरंच छत्रपती शिवाजी महाराज परत आले तर काय होईल? मोठे जिकरीचे प्रसंग उभे राहतील. आपण गृहीत धरू की, साधारणतः पंचवीस वर्षांचे छत्रपती शिवाजी महाराज जर आज अचानक आपल्यामध्ये प्रकट झाले तर काय काय होईल? ही मोठी मजेशीर गोष्ट असेल! लोक आश्चर्यचकित होतील! काहींना मनोमन आनंद होईल, तर बऱ्याच लोकांना अनंत अडचणी निर्माण होतील!महाराज आल्याबरोबर सवंगडी, सोबती शोधतील! त्यांनी उभारलेली शहरे त्यांना दिसणार नाहीत. महाराजांना पाहून तरुणांना काही काळ आश्चर्य होईल! महाराजांच्या भोवताल जो तो महाराजांसोबत सेल्फी काढायची घाई करेल! प्रचंड गर्दी पाहून 'काय चालले आहे?' याचा महाराजांना




काहींच अंदाज येणार नाही. सेल्फीच्या नादात महाराजांना कुणी निवास-जेवण बाबतीत विचारेल का? परंतु एखादा गरीब माणूस येवून महाराजांना आपल्या घरी घेऊन जाईल! "बोल बोलता वाटे सोपे" या तुकोक्तीप्रमाणे महाराजांची व्यवस्था आपल्याकडून होईल का? महाराज राजे आहेत! त्यांना आल्याबरोबर आपल्याला त्यांचा हुद्दा बहाल करावा लागेल! हे सगळेच मोठे आव्हानात्मक असेल. महाराज जिथेही जातील, तरुणांना भेटतील त्यावेळी तरुणांना काही प्रश्न विचारतील. तरुणांना आपल्या मोबाईलपासून सुटका मिळेल का? मोबाईल सोडून तरुण महाराजांच्या सोबत जातील का? त्यानंतर महाराज स्वराज्य शोधण्याचा प्रयत्न करतील. महाराजांना त्यांच्या अनुरूप मानासन्मानाचे पद कोण देईल? इथे सगळेच पक्ष आपापले अस्तित्व टिकवण्याचा आटापिटा करत असतांना अचानक छत्रपती शिवाजी महाराज आलेले पाहून त्यांच्यासमोर ते अवाक होतील! काय करावे आणि काय नाही? गहन समस्या निर्माण होईल! भ्रष्ट, व्यसनी, व्यभिचारी, स्वार्थी सत्ताधाऱ्यांना महाराज आलेले पचतील का? आल्याबरोबर महाराज कुठे जातील? महाराज सरळ सामान्य रयतेमध्ये जातील. प्रचंड गर्दी-समस्या पाहून महाराज अचंबित होतील. पिडीत, शोषित, गरीब आपली कैफियत महाराजांकडे मांडतील. महाराज भावनिक होतील! आपल्या अष्टप्रधान मंडळाला आदेश देण्याच्या आवेशात असतांना लक्षात येईल की; इथली बेगडी लोकशाही मुठभर धनदांडग्या चोरांच्या दावणीला बांधली असून हे चोरच साव असल्याचा आव आणून दिवसाढवळ्या लोकशाहीचे लचके तोडत आहेत. अनेक पिढ्यांची सत्ता यांच्याचकडे असून यांनी कोणतीही लोकोपयोगी कामे केली नाहीत हे पाहून महाराज व्यथित होतील! सामान्य रयतेमधून उठून महाराज ताडताड विधानभवनाकडे निघतील! मंत्रालय आणि विधानभवन पाहून महाराजांना आनंद होईल! पण ते विधानभवनसुद्धा महाराजांना पाहून रडायला लागेल! इथे सामान्य माणसांचे प्रश्न केवळ चर्चिले जातात, मात्र त्याच्यावर अंमल होत नाही. इथे शेतकऱ्यांच्या मालाच्या भावाची केवळ फोलपट चर्चा होते, भाव काही मिळत नाही! करोडोंची उलाढाल होणारे मंत्रालय नावाचे कुरण पाहून महाराज मनातून व्यथित होतील! मंत्रालयाच्या पायरीवर बसून महाराज ढसाढसा रडतील! मी रयतेचे राज्य निर्माण केले! जात-पात-धर्म भेद केला नाही! शेतकरी सुखी केला! स्त्रीची अब्रू सिरसावंद्य मानली! आई-वडिलांची आजीवन सेवा केली! जीवाला जीव देणारी माणसं उभी केलीं! असं असतांना लोकशाहीत ही हुकुमशाही कशी काय? महाराज ताड्कन उठतील आणि आपले राज्य निर्माण करण्याची प्रतिज्ञा करतील, परंतु कुणीतरी पक्षप्रमुख महाराजांच्या हातात आपल्या पक्षाची सूत्रे सोपविल का?

असो, असे एक ना अनेक प्रश्न उभे राहतील. तेंव्हा, सज्जनहो, गेलेली माणसं पुन्हा परत येत नसतात. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा वसा-वाण घेऊनच आपल्याला पुढे जावे लागेल! आपल्या जीवनात, वागण्या, बोलण्यात, कार्यात छत्रपती शिवाजी महाराज आणावे लागतील! असे होणे महाराज पुन्हा येणे होय! हीच खरी शिवजयंती!

**जय हिंद! जय शिवराय!**



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

# नागरिकांनी सण, उत्सव एकोप्याने साजरे करावेत

## पोलिस अधीक्षक संजय बारकुंड यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आगामी काळात विविध सण, उत्सव येत आहेत. सर्वधर्मीय नागरिकांनी सण, उत्सव सामंजस्य आणि एकोप्याने साजरे करीत जिल्हा प्रशासन आणि पोलिस दलास सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस अधीक्षक संजय बारकुंड यांनी येथे केले. आगामी काळात विविध सण, उत्सव येत आहेत. या पार्श्वूमीवर नियोजन सभागृहात आज सकाळी शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी महापौर प्रतिभा चौधरी, महानगरपालिका आयुक्त देविदास टेकाळे, उपविभागीय अधिकारी ऋषिकेश रेड्डी, अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय गायकवाड, उपजिल्हाधिकारी देवदत्त केकाण, महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त नितीन कापडणीस आदी उपस्थित होते. पोलिस अधीक्षक बारकुंड म्हणाले, की आगामी काळातील सण. उत्सवाच्या निमित्ताने पोलिस दलाने बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. आवश्यक तेथे वाहतूक वळविण्याचे नियोजन करण्यात येईल. तसेच रात्रीची गस्त वाढविण्यात येईल. आगामी सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर महानगरलिकेतर्फे आवश्कतेनुसार उपाययोजना केल्या जातील, असे महापौर श्रीमती चौधरी यांनी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी गायकवाड म्हणाले, की आगामी. सण- उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महानगरपलिकेने स्वच्छता विभागाला निर्देश द्यावेत, अशी सूचना केली आहे. नागरिकांनी सण, उत्सव शांततेत साजरे करून जिल्हा प्रशासनाला सहकार्य करावे. पोस्टर, बॅनर करीता संबंधित विभागाची परवानगी घेणे आवश्यक राहील. यावेळी उपस्थित नागरिकांनी विविध सूचना केल्या. अपर पोलिस अधीक्षक काळे यांनी प्रास्ताविक केले. पोलिस निरीक्षक धिरज महाजन यांनी आभार मानले. यावेळी नागरिक, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



# मायबाप कवितासंग्रहाच्या दुसऱ्या आवृतीचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** लोहगाव, ता. पैठण येथील पाठयपुस्तकातील प्रसिध्द कवी तथा पाणपोई कार अय्युब पठाण लोहगांवकर यांचा दर्जेदार प्रौढ व बालकविता संग्रह मायबापच्या दुसऱ्या आवृत्तीचे दि. १४ फेब्रुवारी २०२३ रोजी औरंगाबाद येथे व्हॅलेंटाईन दिनाचे औचित्य साधुन प्रसिध्द कवीवर्य फ.मु. शिंदे, आणि प्रख्यात बालसाहित्यिक डॉ. लिला शिंदे यांच्या शुभ हस्ते त्यांच्याच निवासस्थानी प्रकाशन करण्यात आले. यावेळी कविवर्य फ.मु. शिंदे म्हणाले की, जीवनात संघर्षाचे अधिष्ठान असल्याशिवाय साहित्याचे शब्दच उमठत नाही. आई आणि वडिल यांच्या जीवनावर लेखन करणारा हा सर्वश्रेष्ठ साहित्यिक असतो. या प्रसंगी कवी डॉ. हबीब भंडारे, कवी संजय खाडे, तेजस प्रकाशनाचे प्रकाशक राजीव चौतमल, जाहेद हुसेन शेख, सलमान शेख, मुदस्सर पठाण, काझी सोहेल, शेख रय्यान हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार कवी संजय खाडे यांनी मानले.



# फुलंब्री ते देवगिरी सहकारी साखर कारखान्यापर्यंत टाकलेले सिमेंट कॉँक्रीटचे डिव्हाईडर तत्काळ हटवा : वाल्मीक जाधव

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** शहरातील खुलताबाद रोडवरील देवगिरी सहकारी साखर कारखान्यापर्यंत दोन्ही बाजूला टाकलेले डिव्हाईडर धोकादायकच आहे ते तत्काळ हटवा अशी मागणी भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव यांनी औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे. या मध्ये दिलेल्या निवेदनावर असे म्हटले आहे की, फुलंब्री टी पॉईंट ते खुलताबाद रोडवरील देवगिरी सहकारी साखर कारखाना पर्यंत तीन ते साडेतीन किलोमीटर अंतरावर भर रस्त्यावर डिव्हाईडर बनवण्यात आले असून ते सर्व सामान्य वाहनधारकांना धोकादायक बनत आहे. या सर्विस रोडचा कुठलाही फायदा नसून ते धोकादायक बनला आहे दुचाकी ते चार चाकी बांधकाम वाहन चालवताना आपला जीव मुठीत धरून वाहने चालव लागतात. यात दररोज छोठे मोठे अपघात होत आहे. तसेच या पुर्वी चार ते पाच जणांचा अपघातात मृत्यू झाला आहे. हा रस्ता ओलांडताना पादचारी नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. चार पदरी रस्त्यावर दोन्ही बाजूला डिव्हाइडर बनल्याने एकावेळी दोन वाहने पास होत नाही व यात अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन या करिता संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन खुलताबाद रोडवरील डिव्हाईडर तोडावे व सर्व सामान्य वाहनधारकांना सहकार्य करावे अशी मागणी भाजपा युवा मोर्चा चे शहराध्यक्ष वाल्मीक जाधव यांनी केली आहे. नसता लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल याची दखल घ्यावी.

# अखंड वीजपुरवठ्यासाठी ग्राहकांनी नियमित बिल भरणे गरजेचे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणच्या उत्पन्नाच्या सुमारे ८० टक्के रक्कम वीज खरेदीवर खर्च होत असल्याने अखंड वीजपुरवठा चालू ठेवण्यासाठी वीजबिलांचे उत्पन्न हा एकमेव उपाय असून घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक व कृषीग्राहक अशा सर्व ग्राहकांनी वीजबिले भरून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले. ते म्हणाले की, महावितरणसुद्धा एक ग्राहक असून इतरांकडून वीज खरेदी करून ग्राहकांना पुरवते. महावितरण स्वतः वीजनिर्मिती करत नाही किंवा कंपनीला कोणाकडून मोफत वीज मिळत नाही. महावितरणच्या एकूण उत्पन्नापैकी सुमारे ८० टक्के रक्कम ही वीजखरेदीवर खर्च होते. २०२१ -२२ या गेल्या आर्थिक वर्षात महावितरणने वीजखरेदीपोटी ६९,४७८ कोटी रुपये खर्च केले होते.

महावितरणला ग्राहकांकडून मिळणारे वीजबिलाचे पैसे हाच उत्पन्नाचा एकमेव मार्ग आहे. बिलाच्या उत्पन्नातून कंपनी वीजखरेदीचे पैसे देते व त्याचबरोबर कर्मचाऱ्यांचे वेतन आणि वीज प्रकल्पांचा खर्च भागवला जातो. वीजबिलांतून उत्पन्न मिळणे म्हणजे महावितरणचा श्वास चालू राहण्यासारखे आहे. अखंड वीजपुरवठा चालू ठेवण्यासाठी महावितरणकडे ग्राहकांनी वीजबिले भरणे हा एकमेव पर्याय आहे. वीज ग्राहकांची बिलांची थकबाकी ७३,३६१ कोटींवर गेल्याने ग्राहकांनी वीजबिले भरणे अधिक गरजेचे झाले आहे.

महावितरणकडून शेतकऱ्यांना खूप मोठ्या सवलतीच्या दरात वीजपुरवठा होतो. तरीही राज्यातील १५ लाख १९ हजार कृषीग्राहकांनी गेली पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ एकही बिल भरलेले नाही आणि त्यांच्याकडे २१,०६७ कोटी रुपये थकबाकी आहे. त्यापैकी ३ लाख २३ हजार असे कृषीपंपधारक ग्राहक आहेत ज्यांनी गेली पंधरा वर्षापेक्षा अधिक काळ एकही वीजबिल भरलेले नाही आणि त्यांच्याकडे ५,२१६ कोटी रुपयांची थकबाकी आहे. विजेमुळे शेतीचे सिंचन होते, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते, त्यातून त्यांना चांगले जीवन जगता येते, तरीही त्यांच्या एकूण खर्चाच्या तुलनेत कमी असलेले वीजबिल भरण्यास काही शेतकऱ्यांची अनास्था दिसते.

वीज ही अत्यावश्यक सेवा आहे. पाणी पुरवठा, रुग्णालयांचे काम, इमारतीतील लिफ्ट, वाहतूक नियंत्रण, कार्यालयांचे कामकाज, बँकिंग अशा अनेक सेवा या वीजपुरवठ्यावर अवलंबून आहेत. त्यासाठी अखंड वीजपुरवठा करायचा तर महावितरणला वीज खरेदी करण्यासाठी पैसे उभे करणे आवश्यक आहे.






# यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अभ्यास शिबीर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** विवेकानंद कला सरदार दलिपसिंग वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद येथे दि.११-१३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीमध्ये ग्रंथालय व माहिती शास्त्र विषयाचे अभ्यास शिबीर आयोजित करण्यात आले. शिबीरामध्ये ३८ संशोधक विद्यार्थी १० मार्गदर्शक सहभागी झाले होते. शिबीरासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून भुजबळ नॉलेज सिटी नाशिक येथील ग्रंथपाल डॉ. संभाजी पाटील आणि अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथील ग्रंथपाल प्रोफेसर मधुकर गरड हे उपस्थित होते तर शिबीराचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर टी आर पाटील होते. शिबीर दरमॅन संशोधक विद्यार्थी यांनी आपले संशोधन आराखडा आणि शोध निबंध सादर केले. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई च्या ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक माननीय डॉ. सुभाष चव्हाण यांची BOSLA संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक माननीय डॉ धर्मराज वीर यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. शिबीराचे आयोजक माननीय प्राचार्य डॉ डी.आर. शेंगुळे आणि केंद्रसंयोजक डॉ गोवर्धन औटे यांनी सर्व संशोधक विद्यार्थी आणि मार्गदर्शक यांचे स्वागत केले. शिबीर आयोजनासाठी केंद्र सहायक रामेश्वर किटे, राजेश जगताप आणि ग्रंथालय कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

# सनी साळवे खून प्रकरणी २४ रोजी सुनावणी

आधुनिक केसरी न्यूज


**धुळे :** शहरातील देवपूर भागात हल्ल्यातून खून झालेल्या सनी साळवे खून प्रकरणी न्यायालयात खून खटल्याचे तपास अधिकारी सचिन हिरे यांची महत्वपूर्ण साक्ष होणार आहे. खून खटल्याकामी अनेक महत्वपूर्ण साक्षीदारांची साक्ष झाली असून निकाल अंतीम निर्णायक टप्प्यावर आला आहे . खून खटल्याकामातील तपास अधिकारी सचिन हिरे यांची दि . २४ फेब्रुवारी रोजी न्यायालयात महत्वपूर्ण साक्ष सुरु होणार असून सदरील साक्षीकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. खून खटला न्या . एम . जी . चव्हाण यांच्या समक्ष सुरू आहे . चंदन नगरातील सनी साळवे याचा १८ एप्रिल २०१८ मध्ये खून झाला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर सुरू न्यायालयात कामकाज सुरू आहे. सदर खून खटल्यातील काही आरोपी हे तुरुंगात आहेत . खटल्याचे पुढील कामकाज २४ फेब्रुवारी रोजी होणार आहे. याकामी विशेष सरकारी वकील शामकांत पाटील हे काम पहात असून ॲड. विशाल साळवे त्यांना मदत करत आहे.

# सचिन कोरडे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** जिल्ह्याचे दैनिक आधुनिक केसरी चे जिल्हा प्रतिनिधी सचिन कोरडे यांना स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. मराठवाडा साथीच्या वतीने गेल्या तीन वर्षापासून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पत्रकारांना हा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जातो. या वर्षी या पुरस्कारासाठी निवड समितीकडे प्रचंड प्रमाणावर पुरस्कार प्रवेशिका आल्या होत्या.

निवड समितीने आलेल्या साहित्य लेखनाचे परीक्षण करून पुरस्कार प्राप्त विजेत्यांची नावे जाहीर केली आहे. या राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी दैनिक आधुनिक केसरीचे जिल्हा प्रतिनिधी सचिन कोरडे यांची निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष मा. वसंत मुंडे मराठवाडा साथीचे मुख्य संपादक



चंदुलाल बियाणी, दैनिक आधुनिक केसरी संपादक डॉ. प्रभू गोरे व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी, विभाकर खांदेवाले सर यांनी अभिनंदन केले.

निवड समितीने माझे नाव जाहीर करून माझ्या लेखणीला अजून तीव्र बळ दिले त्याबद्दल तर मी त्यांचा आभारी आहेच . त्याचबरोबर हा पुरस्कार दैनिक आधुनिक केसरीच्या वाचक वर्गाच्या प्रेरणेने, मित्र परिवाराच्या शुभेच्छाने, आई-वडिलांच्या आशीर्वादाने मिळत आहे त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे

**पत्रकार सचिन कोरडे**

# रिक्षाचालकावर हल्ला करणारे जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** प्रवासी वाहतुकीसाठी रिक्षामध्ये थांबलेल्या चालकाला अडवून त्याच्यावर लोखंडी हत्याराने वार करणाऱ्या एकाला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. तर, त्याच्या दोन अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेतले आहे. पूर्ववैमनस्यातून ही घटना घडल्याचे समोर आले आहे. रेहान सिमा शेख उर्फ रेहान दिनेश शेख (वय १९, रा. खोपडेनगर, कात्रज) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. तर, दोन अल्पवयीन ताब्यात आहेत. १४ फेब्रुवारी रोजी रात्री पावणेसातच्या सुमारास कत्रजमधील सच्चाई माता मंदिर परिसरात ही घटना घडली होती. याबाबत २३ वर्षीय रिक्षा चालकाने फिर्याद दिली आहे. फिर्यादी आणि आरोपी हे एकमेकांच्या परिचयातील आहेत. फिर्यादी हे प्रवासी वाहतुकीसाठी याठिकाणी थांबले होते.

# रुद्राक्ष घेण्यास जात असताना नणंद भावजाईचा अपघाती मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** रुद्राक्ष घेण्यास जात असताना नणंद भावजाईचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना काल रात्री आठच्या सुमारास बायपास रस्त्यावर ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच शहरातील त्यांच्या कूटूंबियांनी घटनास्थळी धाव घेतली. यातील मंगलाबाई भावजयीचे नाव अभिमन जाधव ( ४४) तर नणंदेचे नाव सुनंदाबाई रविंद्र मिस्तरी (४५) असे आहे.

मध्यप्रदेशातील शिऊर येथे रूद्राक्ष वाटपचा कार्यक्रम सूरू होता. गावी या शहरातील माळीवाड





यातील जनतानगर येथे राहणाऱ्या पंधराहून जास्त महीला काल दुपारी रोजी श्रद्धेने रूद्राक्ष आणण्यासाठी गेल्या होत्या. काल १५/२/२३ रोजी रात्री आठ च्या सुमारास जेवणासाठी या महीला देवास बायपास रोडलगतच्या उपहारगृहात थांबल्या होत्या. जेवण झाल्यानंतर रस्ता ओलांडताना समोरून येणाऱ्या भरधाव स्कार्पीयो या गाडीने या नणंद भावजयींना उडवले. यात नणंद सुनंदाबाई रविंद्र मिस्तरी यांचे जागेवरच निधन झाले. तर भावजयी असलेल्या मंगलाबाई या गंभीर जखमी झाल्या. त्यांना देवास येथिल रूग्णालयात उपचारार्थ रात्रीच दाखल केले. प्रकृतीत थोडी सुधारणा झालेवर त्यांना दि. १६ रोजी सकाळी घरी शिंदखेडा येथे घेवून येत असतांना रस्त्यातच त्यांचे निधन झाले.



# राष्ट्रवादीच्या महाप्रबोधन यात्रेचे धुळ्यात जंगी स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, माजी सैनिक महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने महाप्रबोधन यात्रेची सुरवात संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात आलेली आहे. त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माजी सैनिकांच्या प्रबोधन यात्रेचे आगगन धुळे जिल्ह्यात झाले. सदर यात्रेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने राष्ट्रवादी काँगेस भवन, धुळे येथे जंगी स्वागत करण्यात आले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी आणि भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी माजी सैनिक सेलच्या वतीने राज्यव्यापी महाप्रबोधन यात्रा सुरु करण्यात आलेली आहे. भाजपा पक्षाच्या वतीने महाराष्ट्रातील संत व महापुरुषांचा वारंवार अपमान करीत आहेत. त्या विरोधामध्ये संत व महापुरुषांनी केलेल्या महान कार्याची माहिती देण्यासाठी राज्याव्यापी महाप्रबोधन यात्रा काढण्यात आलेली आहे. सदर यात्रेमध्ये ॲड. संभाजीराव जाधव, माजी सैनिक सेलचे प्रदेशाध्यक्ष दिपकराव शेळके, बाबासाहेब जाधव आदी यात्रेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक घेवून महापुरुषांची महंती, त्यांनी केलेले काम, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती पदाधिकारी व कार्यकर्त्यांना देण्यात आली. यावेळेस मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे धुळे शहर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले, जोसेफ मलबारी, प्रशांत भदाणे, महेंद्र शिरसाठ, महानगरपालिकेच्या विरोधी पक्ष नेत्या सौ.कल्पना महाले, नगरसेविका मंगलाताई चौधरी, शकीला बक्ष आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री.अमित शेख यांनी केले. सदर कार्यक्रमाला डी.बी.पाटील, तावडे सर, डि.जे.मराठे, यशवंत डोमाळे, भिका नेरकर, राजेंद्र चौधरी, ॲड.तरुणा पाटील, दिपक देसले, विशाल केदार, रईस शेख, चेतन पाटील, तत्सवर बेग, रामेश्वर साबरे, ऋतिक पोळ, संजय माळी, बरकत शाह, जितू पाटील, फिरोद्दीन शाह, हेमंत पाटील, शोएब अन्सारी, शरीफ शाह, सोनू घारु, स्वामिनी पारखे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सावळदबारा येथे शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शांतता कमेटीची बैठक

## नियमांचे पालन करत शिवजयंती साजरी करा : सपोनि भरत मोरे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथे चक्रधर स्वामी मंदीरावर शुक्रवारी डॉ. विजयकुमार मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत मोरे फर्दापूर पोलिस स्टेशन अंतर्गत शांतता कमेटीची बैठक घेण्यात आली. येत्या 19 फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्सव साजरा होणार आहे. हा उत्सव सुरळीत पार पडावा यासाठी पोलीस प्रशासनाने योग्य ती खबरदारी घ्यायचे ठरवले आहे. शिवजयंती उत्सव साजरा करताना कायदा सुव्यवस्था राखत साजरा करावा, तसेच सामाजिक व प्रबोधनात्मक देखावे सादर करावेत यासंदर्भात पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत मोरे यांनी मंडळांचे पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेऊन आवश्यक त्या सूचना केल्या आहेत. सामाजिक देखावे, प्रबोधन, व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम घेत छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र तरुण पिढीपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करावा, सामाजिक दृष्टीकोनातून काम करावे अशा सूचना सपोनि भरत मोरे यांनी दिल्या. याप्रसंगी सरपंचपती शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान,प्रा. जीवन कोलते पाटील, पंजाबराव देशमुख, मोहन सुरडकर, वसंतराव चोरमारे, गोपीनाथ पुजारी, मधुकर पुजारी,पुरुषोउत्तम पुजारी,डि. एन.नप्ते,मो.तालिब मो.शब्बीर, अरुण नप्ते, फर्दापूर स्टेशनचे आनंद पगारे, बिट जमादार मिरखॉ तडवी, शिवदास गोपाळ व पोलीस कर्मचारी,व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रति अयोध्यानगरी वैजापूर प्रभू रामचंद्र यांच्या जयजयकाराने दुमदुमले

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथे श्री साईभक्त बहुउद्धेशिय सेवाभावी संस्थेच्या



वतीने १४व्या वर्षी श्री साई सच्चरीत पारायण चालू आहे व या निमित्ताने रामायनाचार्य हभप रामरावजी ढोक महाराज यांच्या अमृतवाणीतून तुलसी रामायण कथा सायंकाळी ७ते१०या वेळा जि.प.प्रशाला मैदानावर चालू आहेत या कथेत दुसऱ्या दिवशी गुरुवार( ता,१६ ) रोजी या प्रति अयोध्या नगरीत रात्री दहा वाजता रामायणातील छोट्या प्रति प्रभू रामचंद्र यांचा जन्म दाखविण्यात आला. अत्यंत चिमुकला प्रभू रामचंद्र यांच्या प्रति रुपातील शिवाय वर्मा या चिमुकल्या ला पाळण्यात शांत स्वरूपात पाहून प्रभू रामचंद्र यांच्या रुपात पाहून अख्खे वैजापूर शहर व परिसर आनंदला ,फुलांचा वर्षाव व सुंठी चा प्रसाद घेऊन"सियावर रामचंद्र की जय"श्रीराम जय राम जय जय राम, म्हणत सर्वमहिला व पुरुष वर्ग टाळ्यांच्या कडकडाटात नाचण्यात बेधुंद झाले, या समयी योगिता साखरे,प्रियांका साखरे,व अरुणा साखरे यांनी पाळणा गायीला तर मेघा भावसार, छाया भावसार, स्नेहल वर्मा, रेवती लालसरे, पुष्पा ठोंबरे यांनी चिमुकल्या प्रभू रामचंद्र यांचे औक्षण केले. हभप ढोक महाराजही प्रभू च्या अवतरणाने आनंदले, त्यांनी तुलसी राम कथेचे दुसरे पुष्प गुंफताना बोलताना सांगितले की,आजच्या मानवी जीवनातील सर्व प्रश्नांची उत्तरे ही रामकथेतून मिळतात. संसारातील तापट अहंकार दूर करण्यासाठी रामायण कथा आहेत, जीवनातील विविध वेदनारूपी व्यथा वर रामबाण उपाय म्हणजे रामकथा आहेत. समाजातील प्रत्येकघटकाने रामकथा श्रवण केल्यास जीवनातील अंधाराचे समूळ उच्चाटन रामकथा श्रवणाने शक्य आहे असेही ते म्हणाले.




# व्याख्यान मालेमुळे शिवचरित्र घराघरात पोचेल : डॉ. शिवरत्न शेटे

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंतीनिमित्त श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित तीन दिवसीय व्याख्यान मालेचे अयोजन केले असता दि.१६ फेब्रुवारी रोजी डॉ. शिवश्री. शिवरत्न शेटे यांचे व्याख्यान पार पडले. शिवछत्रपतींचा इतिहास अबाल वृद्धांना कळावा यासाठी पंढरीत छत्रपतींच्या जीवनपटलावर व्याख्यानमालेचे सुंदर व्याख्यान पार पडले.

यावेळी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील, व्हा.चेअरमन प्रेमलताताई रोंगे, पंढरपूरचे माजी नगराध्यक्ष सुभाष दादा भोसले, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते देवानंद गुंड पाटील, बाळासाहेबांची शिवसेनेचे नेते महेश नाना साठे, श्रीरंग बागल, ब्रिगेडचे श्री पवार, शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील, प्रतिष्ठानचे नंदकुमार बागल, परवेज मुजावर, शरद घाडगे व सर्व पदाधिकारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# सातारा पोलिसाचा महिलांसमोर दारु पिऊन धिंगाणा; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** काही दिवसांपूर्वीच सहाय्यक पोलिसआयुक्त विशाल ढुमे ने दारु पिऊन महिलेची छेडछाड करत पोलिसआयुक्तालयाची लक्तरे वेषीवर टांगलेली असतांनाच सातारा पोलिस ठाण्यात कार्यरत असणारा पीएसआय अनिल विश्वनाथ बोडले (५४)यांने काल संध्याकाळी ६.३०ते७.००च्या सुमारास त्याच्या राहत्याघरासमोर महिलांशी दारुच्या नशेत गैरवर्तन केले. या प्रकरणी पहाटे १२.३०वा. जवाहरनगर पोलिस ठाण्यात आरोपी पीएसआय अनिल बोडले विरुध्द वरिष्ठांच्या अदेशावरुन गुन्हा दाखल झाला असून त्याला प्रकरणी नोटीस जारी केल्याची माहिती पोलिस निरीक्षक शिवाजी तावरे यांनी दिली.

या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर या प्रकरणाचा अहवाल पोलिसउपायुक्त शिलवंत नांदेडकर यांना सादर करण्यात आला. त्यांनी पोलिसआयुक्त डॉ.निखील गुप्ता यांना सुपूर्द केला. लवकरच या प्रकरणावर आयुक्त निर्णय घेतील असे नांदेडकर म्हणाले. आरोपी पीएसआय बोडले हा मयूरबन




कॉलनीतील नेक्स्टवन भागात राहतो. महिलांना कॉलनीच्या आवारात येत अपशब्द वापरले.म्हणून ४० वर्षीय महिलेने परिसरातील नागरिकांसोबंत जवाहर नगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. या प्रकरणामुळे पोलिसांची समाजात असलेली प्रतिमा खराब झाल्याची भावना नागरिक बोलून दाखवतात. पुढील तपास पोलिस निरीक्षक व्यंकटेश केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसअय राऊत करत आहेत.

# एस. टी. कर्मचाऱ्यांच्या समस्या अधिवेशनात लावून धरू

## नाना पटोले : कर्मचाऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलू नये !

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिंदे-फडणवीस सरकार एस. टी. महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पगार वेळेवर करू शकत नाही. पगार होत नसल्याने सांगली जिल्ह्यातील एस. टी. कर्मचारी भीमराव सुर्यवंशी यांना आत्महत्या करावी लागली ही सरकारसाठी लाजीरवाणी बाब आहे. एस. टी. कर्मचाऱ्यांच्या पाठीशी काँग्रेस पक्ष खंबीरपणे उभा असून अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांचे प्रश्न लावून धरू, कर्मचाऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे.

यासंदर्भात शिंदे-फडणवीस सरकारचा समाचार घेताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, एस. टी. महामंडळाला पगारासाठी दरमहिना ३६० कोटी रुपये लागतात, हा निधी महाविकास आघाडीचे सरकार असताना दिला जात होता. एसटी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मागण्यासाठी आझाद मैदानात संप केला तेंव्हा त्यांच्या मागण्या मान्य करत महागाई भत्ता वाढवून २८ टक्के करण्यात आला, घरभाडे भत्ता व पगार वाढही देण्यात आली. या संपाच्यावेळीही काँग्रेस पक्ष व मविआ सरकार कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभे होते पण काही राजकीय पक्ष व स्वयंघोषीत नेत्यांनी आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी जाणीवपूर्वक एस.टी. कर्मचाऱ्यांची दिशाभूल केली. एस. टी. महामंडळाचे विलीकरण करावे यासाठी मविआ सरकारच्या विरोधात वातावरण गढूळ करण्यात आले. न्यायालयाने निर्णय देऊनही संप मागे घेऊ दिला जात नव्हता.आज ही मंडळी गप्प का आहेत? एसटी कर्मचाऱ्यांचा पगार का होत नाही ? विलीनीकरण करण्यापासून शिंदे-फडणवीस सरकारचे हात कोणी बांधले आहेत का? असे प्रश्न पटोले यांनी उपस्थित केले आहेत.

एस. टी. कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी महामंडळाला महिन्याला ३६० कोटी रुपये लागतात पण शिंदे फडणवीस सरकार फक्त २२३ कोटी रुपयांवरच बोळवण करत आहे. राज्य सरकारकडे महामंडळाची एक हजार कोटी रुपयांची थकीत बाकी आहे, ती द्यावी अशी महामंडळ मागणी करत असताना राज्य सरकार मात्र पुरेसा निधी देत नाही. एसटी महामंडळाचे पगार करण्यासाठी शिंदे-फडणवीस सरकारकडे पैसे नाहीत परंतु जाहिरातबाजीसह इव्हेंटबाजीवर उधळपट्टी करण्यासाठी मात्र या सरकारकडे पैसे आहेत. एस. टी. कर्मचाऱ्यांचा प्रश्न गंभीर असून आम्ही भाजपासारखे या प्रकरणात राजकारण करणार नाही परंतु अर्थसंकल्पीय अधिवेशनात या सरकारला जाब विचारू आणि एस. टी. महामंडळाचे प्रश्न मार्गी लावण्यास भाग पाडू, असेही पटोले म्हणाले.




# अल्पवयीन मुलींना लग्नाचे आमिष दाखवून केला अत्याचार

आधुनिक केसरी न्यूज

**जयप्रकाश बागडे**

**शेवगाव :** येथील रेसिडेन्शिअल शाळेत शिकणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींना लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेऊन अत्याचार करणाऱ्या बीड जिल्ह्याच्या आष्टी तालुक्यातील दोन तरुणांना सापळा रचून पाठलाग करून पकडण्यात शेवगाव पोलिसांना यश आले असून शेवगावचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी अटक करून बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून शेवगाव तालुक्यातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शेवगाव पोलिसांनी कंबर कसली असल्याचे दिसून येत आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की, 9 फेब्रुवारी रोजी रेसिडेन्शिअल शाळेत शिकणाऱ्या अल्पवयीन दोन मुली शाळेत गेल्या होत्या. परंतु संध्याकाळपर्यंत त्या घरी आल्याच नाही. त्यामुळे मुलींच्या नातेवाईकांनी शेवगाव पोलिसात धाव घेऊन याबाबत तक्रारी दाखल केल्या. या घटनेबाबत पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलिस अधिकारी संदीप मिटके यांना या घटनेची माहिती दिली असता तात्काळ मुलीचा शोध घेण्याच्या सूचना शेवगावचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र बागुल व अंमलदार यांचे पथक नेमले, नेमलेल्या पथकाने अहमदनगर येथे मुलीचा शोध घेऊन नंतर त्यांनी दिलेल्या माहितीवरून शेवगाव पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नंबर 151 /20 23 , 152 / 20 23 भादवि कलम 363, 376 बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम 3 / 4 प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यानंतर आरोपीचा शोध घेऊन 17 फेब्रुवारी रोजी 1 ) विजय श्रीमंत सानप, वय वर्ष 22, रा. मारोळा तालुका आष्टी जिल्हा बीड, 2 ) बाजीराव प्रभू कचरे, वय वर्ष 22, रा. नागतळा तालुका आष्टी जिल्हा बीड या दोन्ही आरोपींना गुप्त माहितीचे अधारे अटक करण्यात आली असून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ही कौतुकास्पद कामगिरी शेवगाव पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक विलास पुजारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र बागुल, पोलीस नाईक धनाजी काळोखे, पोलीस कॉन्स्टेबल किशोर शिरसाठ, परमेश्वर नाकाडे, वासुदेव डमाळे, महिला पोलीस कॉन्स्टेबल प्रियांका शिरसाट, महिला पोलीस कॉन्स्टेबल गीतांजली पाथरकर यांनी ही कामगिरी केली.

# विलास म्हस्के यांना उत्कृष्ठ पत्रकार पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** क्रांतीवीर लहुजी साळवे



कर्मचारी कल्याण महासंघ व सत्यशोधक दर्पणच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त, क्रांतीगुरु लहुजी साळवे यांच्या स्मृतीदिना निमित्ताने व साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशतब्दी वर्षा निमित्ताने सन्मान सोहळ्याचे आयोजन दिनांक १९ फेब्रुवारी रविवार रोजी मौलाना आझाद संशोधक केंद्र, टिव्ही सेंटर, औरंगाबाद येथे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी उद्घाटक डॉ. भागवत कराड, अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. भगवानराव वाघमारे (लातुर), असणार आहे. तर विशेष अतिथी म्हणुन अजित रॉय तोगरे (सीजीएसटी,औ. बाद), क्रांती भावे (नागपूर), अनिल म्हस्के (महाव्यवस्थापक- लो.अ.सा. वि. म. मुबंई ) लाभणार असून प्रमुख अतिथी म्हणुन प्रा. संजय गायकवाड, वसंतगालफाडे, इंजि. मधुसुदन कांडलीकर, डॉ. दिगंबर नेटके, इंजि. दिपक लांडगे, राजू आहिरे, श्रीमती जिजा साने, आंदीची उपस्थिती लाभणार असून वैजापूर येथील दैनिक प्रतिवीर औरंगाबाद आवृत्तीचे कार्यकारी संपादक विलास म्हस्के यांची दखल घेऊन त्यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तर वैजापूर सामाज भूषण अतिष (बंटी) भाऊ साठे यांना तर उत्कृष्ट व्यावसायिक पुरस्कार काशिनाथ सोळसे यांना प्रदान करण्यात येणार आहे त्याच बरोबर मातंग समाजातील १०० यशस्वी व्यवसायिक, वकील, पत्रकार यांचा सत्कार होणार आहे. या पुरस्कार बद्दल मुख्य संपादक चंद्रशेखर गायकवाड, निवासी संपादक संतोष गवळी, कार्यकारी संपादक विरल भैय्या गायकवाड, पत्रकार प्रशांत, त्रिभुवन, दीपक थोरे, पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील त्रिभुवन, सचिव किरणसिंग राजपूत, साहेबराव पडवळ, संदीप भाऊ विदुर, सलीम सय्यद, प्रवीण खाजेकर, बाळासाहेब गायकवाड, सिद्धार्थ भुईगळ, शिवा भाऊ थोरात, रुद्रा शेजवळ, ॲड आकाश ठोळे, पत्रकार जीवन पठारे,विशाल त्रिभुवन, लहानु त्रिभुवन, सागर सोनवणे, सूचित कांबळे, नितीन दांडगे, पत्रकार संघ, युवा लहुजी भीम प्रतिष्ठान आदींनी अभिनंदन केले आहे.



आधुनिक केसरी न्यूज

**सकल मातंग समाजाच्या वतीने लहुजी साळवे यांच्या हडको येथील पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. संजय गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब काळुंके, ज्ञानेश्वर हनवते, अतुल खंडगावकर आदी.**

# महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उगारले काम बंद आंदोलनाचे अस्त्र

आधुनिक केसरी न्यूज

बाबुराव गोणारकर

**धर्माबाद :** महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी २ फेब्रुवारी पासून आपल्या मागण्यासाठी आंदोलनाचे अस्त्र उगारले असून त्याचे पडसाद धर्माबाद मध्येही उमटले आहेत. धर्माबाद शहरातील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन छेडले आहे.

राज्य सेवक संयुक्त कृती समितीने आंदोलनाचे प्रारूप विशेद केला आहे.२ फेब्रुवारी पासून राज्यात सुरु असलेल्या परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकणे,१४ फेब्रुवारीला २ ते २:३० या वेळेत निदर्शने करणे, १५ फेब्रुवारीला काळ्या फिती लावून काम करणे, १६ फेब्रुवारीला एका दिवसाचा लक्षणिक संप पुकारणे जर शासनाने मागण्या मंजूर केल्या नाही तर २० फेब्रुवारी पासून बेमुद्दत संपावर जाणे. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी २ फेब्रुवारीला राज्यात सुरु असलेल्या परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकल्यामुळे परीक्षा विस्कळीत झाल्या होत्या. यातून मार्ग काढण्यासाठी शिक्षकेत्तर कर्मचारी व उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात चर्चा झाली. मात्र शासनाने लिखित स्वरूपात मागण्या मंजूर न केल्याने चर्चा फिसकटली. एक, सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा रद्द केलेला शासन निर्णय पुनर्जीवीत करणे. दोन,१०,२०,३० लाभाची योजना शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करणे तीन, सातव्या वेतन आयोगाचा फरक



देणे, विद्यापीठातील १४१० कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू करणे चार, महाविद्यालयातील रिक्त पदे भरणे पाच, जुनी पेन्शन योजना लागू करणे. लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला असून जोपर्यंत शासन मागण्या मंजूर करीत नाही तो पर्यंत काम बंद आंदोलन सुरु राहील असा इशारा दिला.

या संदर्भातील निवेदन स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या कुलगुरूना निवेदन देण्यात आले. या निवेदनावर गणेश जाधव, आनंद तोटेवाड, विलास झपंलवाड, वर्षा मेडेवार, रिंकू नक्का,व्यंकटेश पालकृतवार, चिमणाजी, सुरेश भद्रे, मरोती म्हैसे, शंकर लखमावाड, मारोती डेबेकर, देविदास आडेराव आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नाशिकमध्ये देहदान, अवयवदानविषयक अधिवेशन

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** श्रेष्ठदान महाअभियानच्या वतीने येथे देहदान, अवयवदानविषयी शनिवारी राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता रावसाहेब थोरात सभागृहात हे अधिवेशन होणार आहे. पालकमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे अध्यक्षस्थानी असतील. प्रमुख पाहुणे म्हणून आ. हिरामण खोसकर उपस्थित राहणार असल्याची माहिती अभियानाचे प्रमुख डॉ. भाऊसाहेब मोरे यांनी दिली.अधिवेशनाच्या उद्घाटन सत्राआधी सकाळी नऊ वाजता शहर परिसरातील वेगवेगळ्या मार्गावरून प्रभात फेरी काढण्यात येणार आहे. फेरीत वैद्यकीय महाविद्यालये आणि परिचारिका महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. यानंतर वैद्यकीय शिक्षण आणि श्रेष्ठदान याबाबत वैद्यकीय क्षेत्राची अपेक्षित भूमिका या विषयावर चर्चासत्र होणार आहे. दुपारी तीन वाजता श्रेष्ठदानाच्या संबंधित कायद्यांमध्ये बदलांची गरज, तसेच कायद्यांच्या अंमलबजावणीच्या पद्धतीत अपेक्षित बदल अंतर्गत पोलीस यंत्रणांचा सहभाग व जबाबदारी या विषयावर डॉ. सुधीर कुलकर्णी, डॉ. कैलास जवादे, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण यांच्या उपस्थितीत चर्चासत्र होईल.

# क्रीडा स्पर्धांमधील अधिकाऱ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा

## राज्यमंत्री डॉ. भागवत कराड : जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी ग्रामीण भागात अहोरात्र काम करत असतानाच तब्बल बारा वर्षांच्या कालखंडानंतर जिल्हा परिषदेचे विकास मीना यांनी जिल्हास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करुन खूप चांगले काम केले आहे, त्याबद्दल त्यांचे आणि आपले सर्वांचे अभिनंदन करतो. तसेच सर्व कर्मचारी, अधिकाऱ्यांनी क्रीडा स्पर्धांमध्ये जो उत्साह दाखवला तो वाखाणण्याजोगा आहे, असे प्रतिपादन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी जिल्हा परिषद औरंगाबादच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या पारितोषिक वितरण सोहळयाप्रसंगी केले. सर्वच बाबतीत आपल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे नाव अग्रेसर राहील यासाठी मी नेहमीच आपल्या सोबत आहे आणि कायम राहील. मी औरंगाबाद जिल्ह्यातील रस्त्यांसाठी भरघोस निधी मंजूर करुन आणला आहे.मी औरंगाबादचा असल्याने थोडा जास्त निधी कसा मिळवता येईल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. आदरणीय पंतप्रधान मोदी साहेबांच्या नेतृत्वात मोठ्या प्रमाणात विकास कामे आम्ही करत आहोत.जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षाताई मीना या ही उपस्थित आहेत.त्या ही तिथे चांगले काम करत आहेत.जालन्यात ही आता अशा स्पर्धा घ्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना व त्यांच्या सुविद्य पत्नी जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा मीना या सीईओ दाम्पत्यांचे केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ भागवत कराडांकडून तोंड भरुन कौतुक.

आपल्या जिल्ह्यात या महिन्यात दोन दिवस G 20 परिषद असून, त्यानिमित्ताने जगाच्या पातळीवर शहराचे महत्त्व पोहचणार आहे.यात केवळ 20 सच नाहीतर 40 देशांचे प्रमुख तसेच दोन दिवस अगोदर केंद्रीय स्मृती इराणी उपस्थित राहणार आहेत.यात जिल्हा परिषदेचा मोठा सहभाग राहील.

विकास मीना- आपण सगळ्यांनी उत्स्फूर्तपणे केवळ आठ दिवसांत तयारी करून स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल सर्वांचे खूप खूप




अभिनंदन आणि शुभेच्छा.हार,जित कोई मायने नहीं ...पण तुम्ही जो संयम बाळगला, कुठेही गोंधळ झाला नाही. सुरुवातीला उद्घाटनाच्या दिवशी जी शपथ घेतली होती तिचे सर्वांनी पालन केले, त्याबद्दल पुन्हा एकदा सर्वांचे मनापासून अभिनंदन. आपण पुढच्या वर्षी डिसेंबर, जानेवारीमध्येच स्पर्धा घेऊ, असे आश्वस्त करतो, असे म्हणताच सभागृहातून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.आणि सिईओ साहेब कैसे हो ....मीना साहेब जैसे हो... अशा घोषणाही झाल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्य सभागृहात विजेत्यांना बक्षीस वितरण प्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना, जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक श्रीमती वर्षा मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी चंद्रकांत पाटील,सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन तुपे,पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग तथा एमआरईजीएसचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद मिरकले,जिल्हा कृषी अधिकारी प्रकाश देशमुख,शिक्षणाधिकारी एम आर देशमुख,जयश्री चव्हाण,अरुणा भुमकर,पंचायत विभागाचे प्रभारी उपमुख्य कार्यकारी तथा समाजकल्याण अधिकारी शिवराज केंद्रे,जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ सुरेखा माने, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील ठाकरे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर,अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रेखा भंडारी यांच्यासह सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# फुलंब्री नगरपंचायत येथे शिवजयंती उत्सवसमिती कार्यकारणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** नगराध्यक्ष तथा उत्सव समितीचे मार्गदर्शक सुहासभाऊशिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली ही कमिटी जाहीर करण्यात आली व पुढील प्रमाणे नवनिर्वाचित कमिटी अध्यक्षकृष्णा_पाथ्रे, उपाध्यक्ष अजय ढोले, उपाध्यक्ष सुनील शेरकर, कार्याध्यक्ष सुमित प्रधान, सचिव ऋषिकेश सराफ, सहसचिव दत्ता संकपाळ, सहसंघटक राम हापत, सह संघटक विकास पंडित, कोषाध्यक्ष सुनील शेवाळे, सह कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर वाघ अशी ही कमिटी जाहीर करण्यात आली व सर्व कमिटींना शुभेच्छा देण्यात आल्या व याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक देवराव मामा राऊत, माजी सरपंच प्रभाकर सोटम, शहराध्यक्ष योगेश मिसाळ, भाजपा ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष राम बनसोड, भाजपा युवा मोर्चा वाल्मीक जाधव, रवींद्र काथार, अजय शेरकर, यशवंत वाघ, सुनील हापत, संतोष रघू विलास शेरकर, अतुल रघु मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

# बाजार सावंगी येथे निरंकारी सत्संग समारोह

आधुनिक केसरी न्यूज

**बाजारसावंगी :** येथे शनिवार18-2-2023 सायं 5.30 ते 8.00 वाजेपर्यंत प.पू अविनाश जाधव सातारा झोन प्रचारक यांच्या मुख्य उपस्थितीत होणार आहे तरी सर्व महापुरुषांनी यावे असे बाजार सावंगीचे मुखी एस.बी. नलावडे यांनी सांगितले. विनीत संत निरंकारी मंडळ बाजार सावंगी शेखपुर वाडी ममुराबाद वाडी जेठे वस्ती सत्संग समाप्तीनंतर लंगर फराळ प्रसादी राहील. जास्तीतजास्त संत महात्म्यांनी, यावे असे आवाहन सुधाकर औटे यांनी केले आहे.

# प्रथमेशने पटकावला जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी साई पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच गीता बाल विद्या मंदिर इंग्लिश स्कूलचा इयत्ता दहावीचा विद्यार्थी प्रथमेश गिरधर जाधव याने तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळून त्याची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती.

जिल्हास्तरीय स्पर्धेतही त्याने प्रथम क्रमांक मिळवून त्याच्या माझ्या स्वप्नातील समृद्ध महाराष्ट्र या निबंधाची राज्यस्तरीय निबंध स्पर्धेसाठी त्याची निवड झालेली आहेत. त्याच्या या निबंध स्पर्धेतील यशाबद्दल संस्था अध्यक्ष किशोर नलावडे संस्था सचिव दत्तात्रय गंडे, प्राचार्य गिरधर जाधव, मुख्याध्यापक गोपाल अधाने, मुख्याध्यापिका साधना नलावडे, क्रीडा शिक्षक राहुल राजपूत, प्राध्यापक अतुल जाधव, रामेश्वर मते, ज्ञानेश्वर अधाने, जीवन अधाने, ज्ञानेश्वर नलावडे, सौरभ दहातोंडे, प्राध्यापिका ज्योती वायसळ, साक्षी जैस्वाल,निर्गुणा वाघ ,वर्षा लोंढे, लक्ष्मी कोलते, कालींदा जंजाळ, रिना जैस्वाल, अनिता नलावडे, रेणुका देवकर, शितल नलावडे गया जाधव, अश्विनी जाधव, छाया जाधव, प्राजक्ता राजपूत, अमोल नलावडे, कल्पना नलावडे, राज्यश्री राणे यांनी त्याचे अभिनंदन करून, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)




डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181

वितरण स्थिती 9021395308 9657398232

घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद